महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०१७

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१७ / अग्रहायण २३, १९३९ (शके)

(१) वित्त व नियोजन, वने मंत्री
(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री
(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री
(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री
(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री
(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री

} यांचे प्रभारी विभाग

प्रश्नांची एकूण संख्या - ६७

राज्यात जलयुक्त शिवार योजनेच्या प्रस्तावित कामांना तीन वर्षापूर्वीची दरसूची लागू केल्याबाबत

(१) * ९६३०७ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१५-१६ व २०१६-१७ या वर्षामध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या जलयुक्त शिवाराच्या कामांसाठी सन २०१३-१४ या वर्षाची दरसूची लागू करण्याचे आदेश काढल्याने राज्यभरातील १९९२७ कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकण विभागात जलयुक्त शिवार योजनेसाठी गतवर्षी प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांना ३ वर्षापूर्वीचे दर लागू केल्याने चार जिल्ह्यातील ३५२ कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बांधकाम साहित्यांचे वाढलेले दर, तांत्रिक यंत्र सामुग्रीसाठी लागणारा निधी आणि इंधनात झालेली वाढ यामध्ये खर्च वाढूनही निधी पूर्वीप्रमाणे देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, यामध्ये सिमेंट बंधारे, नाला बंधारे, कोल्हापूर बंधारे, नदी गाळ उपसा, ओढा आणि पर्याय खोलीकरण, रुंदीकरण आदि कामे प्रस्तावित आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जलयुक्त शिवाराची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली व याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

तथापि, जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१६-१७ मध्ये रत्नागिरी जिल्हयात १३२ कामे, रायगड ६८ व सिंधुदुर्ग ३२ कामे प्रलंबित आहेत.
(३) जलसंपदा विभागाची दरसूची जलसंधारण विभागामार्फत आतापर्यंत वापरण्यात येत होती. जलसंपदा विभागाने सन २०१६-१७ मध्ये नवीन दरसूची प्रसिध्द केली आहे. त्यानुषंगाने जलसंधारण विभागामार्फत स्वतंत्र दरसूची तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असून तोपर्यंत जलसंपदा विभागाची सन २०१३-१४ ची दरसुचीचा अवलंब करण्याच्या सुचना शासन पत्र दि. २० मे, २०१७ अन्वये देण्यात आल्या आहेत.
(४) होय.

(५) शासन निर्णय दि.२७/४/२०१७ व दि.२२/५/२०१७ अन्वये कोकण विभागातील सन २०१६-१७ मधील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत प्रलंबित कामांसाठी अनुक्रमे रू.६.७० कोटी व १२.२२ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

तसेच मृद व जलसंधारण विभाग परिपत्रक दि.०१/११/२०१७ अन्वये मृद व जलसंधारण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कामांच्या अंदाजपत्रकीय दरपृथक्करणासाठी विभागाची सामाईक दरसूची तयार करण्यासाठी आयुक्त, मृद व जलसंधारण आयुक्तालय, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली ०७ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या ४ बैठका झाल्या असून दरसूचीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे, कोल्हापूर व यवतमाळ येथील दहा पर्यटन स्थळांचा विकास करण्याबाबत

(२) * ९५८५९ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अजित पवार (बारामती), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिपक चव्हाण (फलटण) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, कोल्हापूर व यवतमाळ येथील दहा पर्यटन स्थळांचा विकास करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार सदर दहा स्थळांच्या विकासासाठी शासनाने किती निधीची तरतूद केली असून सदर पर्यटन स्थळांचा विकास किती कालावधीत करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल : (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात राबविण्यात आलेल्या कुष्ठरोग शोध अभियानाबाबत

(३) * ९५०८२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुष्ठरोग शोध अभियानात ठाणे जिल्हयात २५२ नवीन कुष्ठरोगी आढळले असून त्यामध्ये ० ते १४ वयोगटातील ४८ बालकांचा समावेश असून, पनवेल (जि.रायगड) तालुक्यात पंतप्रधान प्रगती योजनेअंतर्गत पनवेल पंचायत समितीच्या आरोग्य विभागाच्या कुष्ठरोग शोध अभियानात सर्वेक्षणातून ५०० पेक्षा अधिक संशयीत कुष्ठरोगी आढळले त्यापैकी ६५ जणांना कुष्ठरोगाची लागण झाली आहे, तसेच जव्हार (जि.पालघर) कुटीर रुग्णालय येथे राबविण्यात आलेल्या राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमामध्ये १२८ संशयित कुष्ठरुग्ण आढळून आले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने राज्यात कुष्ठरोग नियंत्रणासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सन २०१६-१७ या वर्षात राज्यातील १६ जिल्हयात १९ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०१६ दरम्यान कुष्ठरोग शोध मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत ठाणे जिल्हयात २५२ नविन कुष्ठरोगाचे रुग्ण आढळून आले. त्यामध्ये ६० बाल कुष्ठरुग्ण आढळून आले. त्या सर्व रुग्णांना बहुविध औषधोपचार देवून रोगमुक्त करण्यात आले आहेत.

त्याचप्रमाणे सन २०१७-१८ या वर्षात राज्यातील २२ जिल्हयात ०६ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०१७ दरम्यान कुष्ठरोग शोध मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात ६५९ संशयित रुग्णांची नोंदणी झालेली होती. संशयित रुग्णांची वैद्यकीय अधिकारी यांचेकडून तपासणी केली असता त्यामध्ये ६६ जणांना कुष्ठरोग झाल्याचे आढळून आलेले आहे. त्या सर्व रुग्णांना बहुविध औषधोपचार सुरु करण्यात आलेला आहे.

त्याचप्रमाणे पालघर जिल्हयातील जव्हार कुटीर रुग्णालय नगरपालिका कार्यक्षेत्रात दि.६ ते २१ सप्टेंबर, २०१७ या कालावधीत राबविण्यात आलेल्या कुष्ठरोग शोध अभियानांतर्गत १८५ संशयित रुग्ण आढळून आले. वैद्यकीय अधिकारी यांचेकडून या संशयितांची तपासणी केली असता १ रुग्णांस कुष्ठरोग झाल्याचे आढळून आले त्याला बहुविध औषधोपचार सुरु करण्यात आलेला आहे.
(२) राज्यातील जास्त कुष्ठरुग्णभार असलेल्या जिल्हयांमध्ये (दर दहा हजारी ०.८ पेक्षा जास्त कुष्ठरुग्णभार) केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार वरील विशेष मोहिम राबविण्यात आली होती. समाजात लपून राहिलेले कुष्ठरुग्ण शोधून त्यांच्यावर उपचार सुरु करणे व संसर्गाची साखळी खंडीत करणे हा मोहिमेचा उद्देश आहे. त्यामुळे शासनाने चौकशी करण्याचा प्रश्न येत नाही.
(३) १. शहरी भागात अवैस यांचेमार्फत जोखमीच्या भागात सर्वेक्षण करुन संशयित रुग्ण शोधून वैद्यकिय अधिकारी यांच्या निदान निश्चिती नंतर त्यांना बहुविध औषधोपचार दिला जातो.

२. ग्रामीण भागात आरोग्य कर्मचारी व आशा यांच्यामार्फत संशयित रुग्ण शोधून वैद्यकिय अधिकारी यांच्या निदान निश्चिती नंतर त्यांना बहुविध औषधोपचार दिला जातो.

३. नविन शोधलेल्या सर्व कुष्ठरुग्णांच्या सहवासितांची तपासणी केली जाते.

४. सांसर्गिक रुग्ण व मुले आढळलेल्या ठिकाणी ग्रामीण भागात संपूर्ण गावाचा व शहरी भागात आजूबाजूच्या ३०० घरांची तपासणी केली जाते.

५. राज्यात ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालय स्तरावर २१९ कुष्ठरोग संदर्भ सेवा केंद्र आहेत. त्यापैकी ठाणे जिल्हयात १५ संदर्भ सेवा केंद्रे, रायगड जिल्हयात १५ संदर्भ सेवा केंद्रे व पालघर जिल्हयात १२ संदर्भ सेवा केंद्रे आहेत. यामार्फत कुष्ठरुग्णांना आवश्यक ते नुसार विकृती प्रतिबंध व वैद्यकीय पुनर्वसन सेवा दिल्या जातात.

६. कार्यक्षेत्रात विविध आरोग्य शिक्षण व जनजागृतीचे कार्यक्रम करुन समाजात कुष्ठरोगाविषयी जनजागृती केली जाते.

७. केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सन २०१५-१६ पासून जास्त रुग्ण भार असलेल्या जिल्हयांमध्ये कुष्ठरोग शोध मोहिमा राबविण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर सन २०१६-१७ पासून ज्या जिल्हयांमध्ये रुग्ण भार कमी आहे या ठिकाणी फोकस लेप्रसि कॅम्पेन व हार्ड टू रिच एरिया या विशेष मोहिमा राबविण्यात आल्या आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

बुलढाणा जिल्हयात निधी अभावी रोजगार हमी योजनेची कामे प्रलंबित असल्याबाबत

(४) * ९५०९२ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात रोजगार हमी योजनेंतर्गत शेतरस्ते, शेततळे, विंधन विहीर, पुनर्भरण इत्यादीचे मंजूरी बाबतचे प्रस्ताव निधी अभावी रोजगार हमी योजना कार्यालयात प्रलंबित असल्याची बाब दिनांक ०४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार रोजगार हमी योजनेंतर्गतचे सदरहू प्रस्ताव मंजूरीसह निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मनरेगा योजनेंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना समान धोरण लागू करण्याबाबत

(५) * १०००४७ श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कंत्राटी कर्मचारी ९ ते १० वर्षापासून संपूर्ण राज्यामध्ये काम करत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना समान धोरण लागू करण्याच्या दृष्टीने दिनांक १ मार्च, २०१४ रोजी मसुदा तयार करण्यात आलेला असतानाही अद्यापपर्यंत लागू करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भातील दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.२३ नुसार नवीन बाह्यस्त संस्थेच्या अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे धोरण संस्थेकडे देऊन त्यांच्या मुलभूत हक्कावर निर्बंध येण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांना संपूर्ण राज्यामध्ये समान धोरण लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल : (१) मनरेगा या योजनेतंर्गत केंद्र शासनाच्या operational guideline नुसार कंत्राटी कर्मचारी नियुक्त करण्याबाबत असलेल्या तरतुदीनुसार कंत्राटी कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात येते
(२) या अनुषंगाने कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात सप्टेंबरच्या महिन्यात ८% मानधनवाढ करणे, महिला कर्मचाऱ्यांना प्रसुती रजा अनुज्ञेय करणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन वेळेत होण्याच्या सूचना, कंत्राटी तांत्रिक अधिकारी व एमआयएस-कोऑर्डीनेटर यांचे मानधनात सुधारणा करण्यात आल्या आहेत.
(३), (४) व (५) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन क्र.११६४६/११७२४/१९९६ प्रकरणी दि. २२.०८.१९९६ रोजी दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने मागील दाराने (Back Door Entry) कोणतीही सरकारी नोकर भरती करता येणार नाही अशा सूचना सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १९.११.२००३ अन्वये दिल्या आहेत. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या नियमित न करण्याबाबत दिलेल्या निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २५.०८.२००५ च्या परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत.

खेड (जि.पुणे) तालुक्यातील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांना सुधारित जलनियोजनात पाणी आरक्षित करण्याबाबत

(६) * ९९२७५ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भामा आसखेड प्रकल्पाच्या (ता.खेड, जि.पुणे) उपयुक्त पाणीसाठा २१७.१० द.ल.घ.मी. पैकी धरणाचे निम्न बाजूस असलेल्या खेड तालुक्यातील भामा, भीमा नदीवरील १० कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याला बारमाही सिंचनासाठी सहा आवर्तने देण्यासाठी ३ टीएमसी पाणी सुधारित जलनियोजनात आरक्षित करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ डिसेंबर, २०१६ रोजी व त्यासुमारास पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सुधारित जलनियोजनात खेड तालुक्यातील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांना किती पाणी आरक्षित केले आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) होय.

(२) मागणीच्या अनुषंगाने भामा नदीवरील खेड तालुक्यातील को.प. बंधाऱ्यासाठी भामा आसखेड प्रकल्पामधून, पाणी उपलब्धतेनुसार महत्तम मर्यादा ९.७७९ द.ल.घ.मी.पाणी सोडणे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

जळगांव जिल्ह्यातील गिरणा नदी पात्रात बंधारा बांधण्यासाठी निधी मिळण्याबाबत

(७) * ९९३३६ श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगांव (जि.जळगांव) शहराच्या पाणी टंचाई निवारणार्थ गिरणा नदी पात्रात कच्चा बंधाऱ्याचे जागी पक्का बंधारा बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजीपासून वारंवार मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्‌वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार गिरणा नदी पात्रात कच्चा बंधा-याचे जागी पक्का बंधारा बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) होय.

(२) गिरणा नदी पात्रात कच्चा बंधाऱ्याचे जागी पक्का बंधारा बांधण्यासाठी जिल्हा नियोजन समिती, जळगांव यांचेकडून निधी उपलब्ध करुन घेण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु असून त्यासाठी आवश्यक अंदाजपत्रक जिल्हाधिकारी, जळगांव यांचकडे जलसंपदा विभागांतर्गत संबंधित मंडळाने पाठविले आहे. जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दि. ३०.१०.२०१७ अन्वये जिल्हा नियोजन अधिकारी, जळगांव यांना निधी उपलब्ध करुन देण्यासाठी व प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविले असून पुढील कार्यवाही त्यांचेकडून अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मेळघाट (जि.अमरावती) मध्ये बालमृत्यू व मातामृत्यूच्या संख्येत झालेली वाढ

(८) * ९५२९० श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) मधील कुपोषण आणि बालमृत्यू रोखण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या अनेक योजनांपैकी मातृत्व अनुदान योजना, जननी सुरक्षा योजना आणि माहेरघर योजना प्रभावहीन झाल्यामुळे सन २०१७ मध्ये २२ मातामृत्यू तर पाच वर्षामध्ये १६० मातामृत्यू व सन २०१२-१३ ते २०१६-१७ या काळात ३८०० बालअर्भक उपजत मृत्यूंची नोंद झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाट हे आदिवासी बहूल घाट आणि डोंगराळ असलेल्या परिसरात गेल्या काही दशकापासून सातत्याने अर्भक, बाल आणि मातामृत्यू होत असून अमरावती जिल्ह्याचा भाग असलेल्या या मेळघाट परिसरात धारणी आणि चिखलदरा या दोन तालुक्यांचा समावेश असून मेळघाटात ४० टक्के आरोग्य उपकेंद्रावर प्रसूतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसून दुर्गम भागात आरोग्य सेवा पोचलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार बालमृत्यू व मातामृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे नाही.

मेळघाट भागात सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीत झालेले मातामृत्यू व बालमृत्यू (० ते ६ वर्ष) अनुक्रमे ५६ व १७८० आहेत.

तसेच, सन २०१७-१८ मध्ये माहे एप्रिल ते जुलै २०१७ या कालावधीत झालेले मातामृत्यू व बालमृत्यू (० ते ६ वर्ष) अनुक्रमे १ व ७२ आहेत.

तसेच, सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीत झालेले उपजत मृत्यू ६६१ आहेत.

(२) हे खरे नाही.

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागात ९२ उपकेंद्र कार्यरत असून ८९ ठिकाणी प्रसूतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत. इमारत बांधकामा विषयी कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

(४) शासनाकडून बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी आरोग्य विभागामार्फत पुढील उपाययोजना करण्यात येतात- संस्थात्मक प्रसूती, नियमीत लसीकरण, नवजात काळजी कक्ष, नवजात स्थिरीकरण कक्ष, विशेष नवजात काळजी कक्ष एचबीएनसी व इन्टेंनसिफाईड एचबीएनसी, जीवनसत्व “अ” व जंतनाशक मोहिम, बाल उपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र, मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत तज्ञांमार्फत मातांची व बालकांची तपासणी व उपचार, नवसंजीवनी कार्यक्रमा अंतर्गत मातृत्व अनुदान योजना, भरारी पथकांमार्फत आरोग्य तपासणी व उपचार, दायी बैठक योजना इ.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

नाधवडे (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) प्रकल्पासह कालव्यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

(९) * १०००२९ श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाधवडे (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) प्रकल्पासाठी व प्रकल्पाच्या कालव्यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला मिळावा म्हणून संबंधित शेतकऱ्यांनी मागील २ वर्षापासून तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी

दिनांक २० जुलै, २०१७ रोजी व तद्पूर्वी मा.जलसंपदा मंत्री, कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, कणकवली आदींकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू नाधवडे प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले असतानाही अद्यापी कालव्याची कामे सुरूच झालेली नसल्यामुळे अद्यापपर्यंत शेतकरी सिंचनापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार नाधवडे प्रकल्पासाठी तसेच कालव्यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला संबंधित शेतकऱ्यांना विनाविलंब मिळण्यासह प्रकल्पाच्या कालव्याची कामे तात्काळ सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) होय.
(२) मुख्य कालवा ८.२५ किलो मीटर लांबीचा आहे. सद्य:स्थितीत १ ते ३ किलो मीटर पर्यंतच्या कालव्याची कामे अंशत: पूर्ण झाली आहेत. ४ ते ५ किलो मीटर मधील माती काम पूर्ण झाले असून भूसंपादन प्रस्ताव निवाडा स्तरावर आहे. तसेच ६ ते ८ किलो मीटर मधील कालव्याची कामे बंदिस्त नलिका प्रणालीद्वारे करण्याचे प्रस्तावित आहे.

सद्य:स्थितीत धरणाचे पाणी नाल्यामध्ये सोडून त्यावर खाजगी उपसाद्वारे शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ होत असून सन २०१६-२०१७ मध्ये २२.६८ हेक्टर क्षेत्र सिंचन झाले आहे.
(३) १ ते ३ किलो मीटर मधील माती काम पूर्ण झाले आहे. भूसंपादनाचा निवाडा जाहीर झाला असून निवाडा रक्कम रू.१०२.९५ लक्ष पैकी रू. ९०.६५ लक्ष भूसंपदान संस्थेला जमा केले आहेत. उर्वरित रक्कम जमा करण्यात येत आहे.

४ ते ५ किलोमीटर मधील माती काम पूर्ण झाले आहे. भूसंपादन प्रस्ताव निवाडा स्तरावर आहे. ६ ते ८ किलो मीटर मधील कालव्याची कामे बंदिस्त नलिका प्रणालीद्वारे करण्याचे प्रस्तावित असल्याने भूसंपादनाची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

खरेदी-विक्रीची बनावट देयके सादर करून ट्रेडलिंक कॉर्पोरेशन कंपनीने विक्रीकर बुडविल्याबाबत

(१०) * ९५०६६ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरेदी-विक्रीची बनावट देयके सादर करून सुमारे सव्वा कोटी रूपयांचा विक्री कर बुडविणाऱ्या मे.ट्रेडलिंक कॉर्पोरेशन कंपनी विरूध्द ठाणे येथील श्रीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची बाब दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार विक्रीकर बुडविणाऱ्या कंपनी विरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) होय, हे खरे आहे. मे.ट्रेडलिंक कॉर्पोरेशन या कंपनी विरुद्ध दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१७ रोजी श्रीनगर पोलीस स्टेशन, ठाणे येथे पहिली खबर क्र.आय-१२४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(२) मे.ट्रेडलिंक कॉर्पोरेशन या कंपनीने प्रत्यक्ष मालाची विक्री न करता फक्त विक्रीची खोटी देयके दिल्याचे व शासनाची कर महसूल बुडविण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आले.

(३) मे.ट्रेडलिंक कॉर्पोरेशन या कंपनीचा महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, २००२ अंतर्गत घेतलेला कर नोंदणी दाखला पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आला. श्रीनगर पोलीस स्टेशन, ठाणे येथे सदर कंपनीविरुद्ध कायद्यानुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली. त्यानुसार श्रीनगर पोलीस स्टेशन, ठाणे येथे दि.९.१०.२०१७ रोजी गुन्हा दाखल झाला आहे. सदर कंपनीच्या खरेदीदार व्यापाऱ्यांकडून कर वसुलीची कार्यवाही चालू आहे.

(४) लागू नाही.

मौजा कोल्ही क्र-१ (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) पुनर्वसीत गावामध्ये नागरी सुविधेची कामे अपूर्णवस्थेत असल्याबाबत

(११) * १००५४१ डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुनर्वसनामध्ये १८ नागरी सुविधा पुरविण्याबाबत शासन निर्णय असतांना मौजा कोल्ही क्र-१ (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) बेंबळा प्रकल्पामधील पुनर्वसीत गावांमध्ये पुनर्वसनाची कामे अपूर्ण असल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्वसीत गावाचे ११ वर्षापूर्वी पुनर्वसन झाले परंतु गावामध्ये रस्ते, नालीचे बांधकाम व स्वच्छता गृह अशी अनेक नागरी सुविधेच्या अंतर्गत करावयाची कामे अपूर्ण असल्याचे निवेदन नागरीकांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुनर्वसीत गावातील पुनर्वसनाची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) बेंबळा प्रकल्पांतर्गत मौजा कोल्ही-१, ता.बाभूळगांव, जि.यवतमाळ या पुनर्वसित गावठाणात अनुज्ञेय १८ नागरी सुविधांची कामे पूर्ण करुन गावठाण गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बाभूळगांव यांचेकडे दिनांक २३/०६/२०१० रोजी हस्तांतरित करण्यात आलेले आहे.

(२) व (३) हे खरे असून पुनर्वसित गावांमध्ये नागरी सुविधांची दुरुस्ती व दर्जेदार नागरी सुविधांची कामे हाती घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मध्य वैतरणा जलविद्‌युत प्रकल्पास मंजूरी देण्याबाबत

(१२) * ९५३५६ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग

बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या मध्य वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी सन २०१० पासून पालिकेने राज्य शासनाकडे पाठपुरावा करुनही अद्याप या प्रकल्पाला परवानगी दिली नसल्यामुळे हा प्रकल्प प्रलंबित असल्याची बाब दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास राज्य शासनाने, सात वर्षात मंजूरी न दिल्यामुळे, सदरहू जलविद्युत निर्मिती, प्रकल्प उभारण्याचा अहवाल आणि प्रकल्प कार्यान्वित करण्याकामी, मुंबई महापालिकेने सन २००८ मध्ये नेमलेल्या मे.ट्रायगॉन कन्सल्टंटस कंपनीवर खर्च केलेले सुमारे ५१ कोटी रुपयांचे मुंबई महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जलविद्युत निर्मिती प्रकल्पासंबंधी राज्य शासनास सादर झालेल्या प्रस्तावास सात वर्षे इतका कालावधी होवूनही त्यास अद्याप शासनाने मंजूरी न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सात वर्षापासून प्रलंबित प्रकल्पास मंजूरी देवून त्यास लागणार आवश्यक निधी उपलब्ध करुन प्रकल्पाचे काम त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) प्रकल्पाला परवानगी दिली नाही, हे खरे नाही.

मध्य वैतरणा हा बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी पाणी पुरवठा प्रकल्प आहे.

राज्यातील जलविद्युत प्रकल्पांचे सर्व्हेक्षण, नियोजन व कार्यन्विनीकरण करणे ही जबाबदारी जलसंपदा विभागावर सोपविण्यात आली आहे. महाराष्ट्र

शासनाने दिनांक १५.०९.२००५ च्या शासन निर्णयान्वये जाहिर केलेल्या धोरणानुसार, २५ मे.वॅ. पर्यंतचे, जलविद्युत प्रकल्प हे खाजगी प्रवर्तकांना विकसनासाठी देण्यात येतात.

या धोरणानुसार मे. महालक्ष्मी कोनाल उर्जा प्रा.लि., पुणे यांनी दि. २०.०१.२०१० रोजी जलविद्युत प्रकल्प विकसनाखाली मागणी केली होती. तसेच मुंबई महानगरपालिकाने दि. ३०.०६.२०१० अन्वये हा प्रकल्प जलविद्युत विकसनासाठीची मागणी शासनाकडे केली होती त्यामुळे प्रथम मागणी करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार मे.महालक्ष्मी कोनाल ऊर्जा प्रा.लि., पुणे यांच्या मागणीचा विचार होऊन शासनाने पत्र दि. २८.२.२०११ अन्वये सर्वेक्षण व अन्वेषण करुन प्रकल्पाचा तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी परवानगी दिलेली आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रकल्प विकासनाबाबतची परवानगी (LoP) न घेता सल्लागार म्हणून मे. ट्रायगॉन कन्सल्टंटस प्रा.लि. यांना नेमल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे किंवा नाही याबाबतची माहिती / आकडेवारी जलसंपदा विभागाकडे उपलब्ध नाही.

(३) सदर जलविद्युत प्रकल्प विकसनासाठी यापूर्वीच मे. महालक्ष्मी कोनाल उर्जा प्रा.लि. पुणे यांना देण्यात आलेला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रस्तावावर माजी मुख्यमंत्री यांनी दिलेले अभिप्राय पुनर्विलोकनासाठी उचित स्तरावर विचाराधीन आहेत.

(४) अंदाजे ११ मे.वॅ. क्षमतेचा सदर जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणाच्या धोरणांतर्गत खाजगी प्रवर्तकाकडून विकसित करणे प्रस्तावित असल्याने सदर प्रकल्पांस शासनाकडून निधी उपलब्धतेचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

जातवैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या विद्यार्थ्यांचे वैद्यकीय व अभियांत्रिकीचे प्रवेश रद्द केल्याबाबत

(१३) * ९८२७४ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी),

श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दिपक चव्हाण (फलटण) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्याप्रकरणी अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग (ओबीसी) प्रवर्गातील ३५३ विद्यार्थ्यांचे सन २०१७ मधील वैद्यकीय व अभियांत्रिकीचे प्रवेश मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रद्द करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) अंशत: खरे आहे. संविधानिक आरक्षणाद्वारे प्रवेश मिळविण्यासाठी जातवैधता प्रमाणपत्र सादर न करता हमीपत्राच्या आधारे वैद्यकीय व दंत पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश पारित केले होते. सदर आदेशास मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०४/०८/२०१७ रोजी स्थगिती दिली होती. त्यानुषंगाने जातवैधता प्रमाणपत्र नसणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द समजण्यात येतील असे आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी नोटीशीद्वारे जाहीर केले होते. त्यामध्ये सर्व प्रवर्गातील एकूण ३५३ उमेदवारांचा समावेश होता. तथापि, त्यानंतर सदर यादीतील ज्या उमेदवारांनी विहीत मुदतीत जातवैधता प्रमाणपत्र सादर केले, अशा उमेदवारांना प्रवेशासाठी पात्र समजण्यात आले आहे.

अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केलेले नाहीत.

(२) मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रवेशासाठी निवड याद्या प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील 'क' व 'ड' श्रेणीची बालगृहे रद्द करण्याच्या निर्णयाबाबत

(१४) * ९६२७० श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ९६३ बालगृहाच्या तपासणीच्या आधारावर 'क' व 'ड' श्रेणीची २१४ बालगृहे रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याची बाब दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालगृहांची मान्यता रद्द करण्याच्या शासन निर्णयानुसार 'क' व 'ड' श्रेणीच्या बालगृहातील मुलांना अनुदानास पात्र असलेल्या 'अ' व 'ब' श्रेणीमधील बालगृहात समाविष्ट करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रद्द करण्यात आलेल्या बालगृहांतील मुलांना 'अ' व 'ब' श्रेणीतील बालगृहांवर अतिरिक्त भार येत असल्याने प्रवेश मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रद्द करण्यात आलेल्या बालगृहांतील मुलांच्या अन्य बालगृहांतील प्रवेशाबाबत आणि 'क' व 'ड' श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) महिला व बाल विकास विभागाकडे ९१३४४ मंजुर प्रवेशित क्षमतेची बालगृहे असून त्यापैकी फक्त २१४ बालगृहे बंद करण्यात येणार असून सद्यस्थितीत १८७४१ एवढेच प्रवेशित बालगृहांमध्ये दाखल आहेत त्यामुळे प्रवेश मिळणेस कोणत्याही अडचणी निर्माण झालेल्या नाहीत.तसेच सदर संस्था शासकीय नसल्याने कर्मचाऱ्यांच्याबाबत शासनाकडून कार्यवाही अपेक्षित नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ब्रम्हपुरी व सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यात उपजिल्हा रुग्णालय सुरु करण्याबाबत

(१५) * ९५१११ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपुरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाचे परिवर्तन करुन १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय गेल्या तीन वर्षापासून मंजूर करण्यात आले असतानाही अद्यापही १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय सुरू करण्यात आले नसल्याचे दिनांक २८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करुन सुरू करण्याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक चंद्रपूर यांनी प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ब्रम्हपूरी व सिंदेवाही तालुक्यात उपजिल्हा रुग्णालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय ब्रम्हपुरी येथील बांधकाम अंतिम टप्प्यात असून किरकोळ कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु आहेत. तसेच ग्रामीण रुग्णालय, सिंदेवाही येथील ३० खाटांच्या रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २८.११.२०१७ रोजी शासनास प्राप्त झाला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

क्षयरोग नियंत्रणासाठी काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबतची नस्ती गहाळ झाल्याबाबत

(१६) * ९६४३४ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यातील आरोग्य केंद्रात सन १९९८ पासून क्षयरोग रुग्णावर उपचार करण्यासाठी सुमारे दोन हजार पेक्षा अधिक कंत्राटी कर्मचारी काम करत असून कमी वेतनावर काम करणाऱ्या या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव क्षयरोग निमंत्रण कार्यक्रमाचे सहसंचालक आरोग्य (कुष्ठ आणि क्षय) यांनी शासनाकडे तीन वर्षापूर्वी पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्षयरोग नियंत्रणासाठी काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत मागणी करणारी नस्ती प्रशासनाकडून गहाळ झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व क्षयरोग नियंत्रणासाठी काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे.

सहसंचालक (कुष्ठ व क्षय) यांनी दि.१६/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत कंत्राटी कर्मचा-यांना सेवेत कायम करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करणे शक्य नसल्याबाबत घेतलेल्या निर्णयाची मूळ नस्ती शासनाकडे उपलब्ध आहे. तथापि सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत मॅग्मो संघटनेने केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाच्या अवलोकनार्थ सादर केलेली नस्ती आढळून येत नाही.

(३) नस्तीचा शोध घेतला असता नस्ती आढळून आली नाही.

(४) क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत नियुक्त केलेले कंत्राटी कर्मचारी हे केंद्रशासनाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या मार्गदर्शक सूचनानुसार करार तत्वावर नियुक्त केलेले निव्वळ कंत्राटी कर्मचारी आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नियुक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित स्वरुपात सामावून घेण्याकरिता शासन निर्णय दि.०५ जून २०१७ अन्वये आयुक्त सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे अध्यक्षतेखाली अभ्यास समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोयना अभयारण्य व सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात (ता.पाटण, जि.सातारा) वन्य प्राण्यांची शिकार करणारी टोळी सक्रिय असल्याबाबत

(१७) * ९६१८५ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोयना अभयारण्य व सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात (ता.पाटण, जि.सातारा) वन्य प्राण्यांची वीजेचा शॉक देऊन, विषारी अन्न, गावठी बॉम्ब, सापळे लावून शिकार करणारी टोळी गेल्या अनेक वर्षापासून सक्रिय असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार वन्य प्राण्यांची शिकार थांबविण्यासाठी व शिकार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात स्वाईन फ्लूच्या रुग्णांच्या संख्येत होत असलेली वाढ

(१८) * ९५०३२ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अबू

आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अजित पवार (बारामती), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: मुंबईसह ठाणे, नाशिक, पुणे, कोल्हापूर, सांगली, अमरावती, नागपूर इत्यादी जिल्ह्यात स्वाईन फ्लू आजाराने सुमारे ५१९ रुग्णांचा मृत्यू झाला असून ४ हजार पेक्षा जास्त व्यक्तींना स्वाईन फ्लूची लागण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जिल्हा व ग्रामीण रुग्णालयांमध्ये स्वाईन फ्लू रुग्णांवर उपचारासाठी लागणाऱ्या टॅमी फ्लू या गोळया व लस उपलब्ध नसल्याने रुग्णांना खाजगी औषधांच्या दुकानातून खरेदी करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार राज्यात स्वाईन फ्लूची बाधा होऊ नये व या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात जानेवारी ते ऑक्टोंबर, २०१७ पर्यत ६०३१ स्वाईन फ्लू बाधित रुग्ण आढळले असून त्यापैकी ७१९ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यात स्वाईन फ्लूवरील ऑसलटॅमीवीर या औषधाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. तसेच इनफल्युएंझा आजारावरील लस स्वाईन फ्लू प्रभावग्रस्त जिल्हांमध्ये आणि मनपांमध्ये स्थानिक पातळीवर उपलब्ध करण्यात आली असून राज्य पातळीवरही खरेदी प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

(४) राज्यात स्वाईन फ्लूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पुढील उपाययोजना केल्या जात आहे.

- फ्लू सदृश्य रुग्णाचे नियमित सर्वेक्षण
- रुग्णांवर वर्गीकरणानुसार विनाविलंब उपचार
- उपजिल्हा रुग्णालयात तसेच वैद्यकिय महाविद्यालयांच्या रुग्णालयात विलगीकरण कक्षाची स्थापना
- उपचार सुविधा असणाऱ्या सर्व खाजगी रुग्णालयांना स्वाईन फ्लू उपचाराची मान्यता
- राज्यातील ५ शासकीय प्रयोगशाळा मार्फत मोफत निदान सुविधा
- रेलिगेअर आणि डॉ.लाल पॅथॉलॉजी लॅब शिवाय इतर खाजगी प्रयोगशाळांना मान्यता देण्यासाठी तज्ञ समित्यांची स्थापना

- ऑसेलटॅमीवीरचा पुरेसा साठा
- दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीतील गरोदर मातांना तसेच उच्च रक्तदाब व मधुमेह असणाऱ्या रुग्णांना आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना फ्लू प्रतिबंधक लसीकरण
- महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समितीची स्थापना
- अन्न व औषध विभागामार्फत खाजगी औषध दुकांनामध्ये ऑसलटॅमीवीर उपलब्ध ठेवण्यासाठी नियमित समन्वय
- शासकीय आणि खाजगी डॉक्टरांचा स्वाईन फ्लू कार्यशाळा
- फ्लू प्रतिबंधासाठी जनतेची आरोग्य शिक्षण

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक (जि.नाशिक) शहरामध्ये रूग्णालयांकडून अवयवदानासंदर्भात होत असलेला गैरप्रकार

(१९) * ९५०५३ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरामध्ये अवयवदानासाठी अपघातग्रस्त महिलेला ब्रेनडेड घोषित करण्याची घाई विजन हॉस्पीटलमधील डॉ.संजीव देसाई यांनी केल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त महिलेच्या पतीने केलेल्या तक्रारीनंतर महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाने दोन रुग्णालयांना कारणे दाखवा नोटिस बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणामुळे अवयवदानाच्या नावाखाली मोठे रॅकेट कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती सदर रुग्णालयांवर तसेच अवयवदानाच्या नावाखाली सुरु असलेल्या रॅकेटसंदर्भात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) व (२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांनी गठीत केलेल्या समितीमार्फत विजन रूग्णालय, नाशिक आणि श्री.साईबाबा रुग्णालय, नाशिक यांची चौकशी करण्यात आली असून चौकशी समितीने चौकशी अहवाल आरोग्य सेवा संचालनालयास सादर केला आहे. त्यानुसार संचालक, आरोग्य सेवा व वैद्यकीय महाविद्यालयामार्फत उच्चस्तरीय समिती स्थापून अहवालानुसार दोषी आढळल्यास त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

खोर (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे सागवान लाकूड जप्त केल्याबाबत

(२०) * ९८६७७ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) वन विभागाच्या दुर्लक्षामुळे चोरटया टोळया तस्कारांकडून वृक्षतोड करत असून खोर येथे पाच लाख रुपयांचे सागवान लाकूड माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान जप्त करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्याची मागणी पर्यावरण संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) शहापूर वनविभागात दिनांक ३०.८.२०१७ व दिनांक १४.९.२०१७ रोजी सागवान व इतर प्रजातीचे रु.१,७७,८१२/- इतक्या किंमतीचा माल जप्त करण्यात आला आहे.

(२) अशा प्रकारची मागणी प्राप्त झालेली नाही.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी ५ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना जामीनावर मुक्त केले आहे.

सदरच्या गुन्हयाचा पुढील तपास वनक्षेत्रपाल, शहापूर यांचेमार्फत करण्यात येत आहे.

पुणे जिल्हयातील पूर्व हवेलीतून वाहणाऱ्या नवीन व जुना उजवा मुठा कालव्यातून पाणी गळती होत असल्याबाबत

(२१) * ९९०८४ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील खडकवासला पाटबंधारे विभागातंर्गत पूर्व हवेलीतून वाहणाऱ्या नवीन व जुना उजवा मुठा कालव्यातून मोठ्या प्रमाणावर पाणी गळती सुरू असल्याची तक्रार नागरिकांनी कार्यकारी अभियंता खडकवासला पाटबंधारे विभाग यांच्याकडे दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन वर्षापासून नवीन मुठा कालव्यातून गळतीचे प्रमाण वाढल्याने लोणी काळभोर, कुंजीरवाडी, सोरतापवाडी (जि.पुणे) या गावांमधील हजारो एकर शेती नापिक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नवीन व जुना उजवा मुठा कालव्याची पाहणी शासनाने केली आहे काय व त्यानुसार कालव्याचे अस्तरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) जुन्या व नवीन मुठा उजवा कालव्यातून फार मोठ्या प्रमाणात गळती नाही व कालव्याच्या सुरक्षिततेस धोका नाही. दूरध्वनीद्वारे अशाप्रकारच्या तक्रारी नागरीकांकडून कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग यांचेकडे केल्या आहेत.

(२) नाही.

(३) सदर ठिकाणची कालव्याची पाहणी क्षेत्रिय अधिकारी यांनी केली असून गळतीचे ठिकाणी कुंजीरवाडी व सोरतापवाडी येथील निवडक ठिकाणी अस्तरीकरणाची अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर असून निधी उपलब्धतेनुसार कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पालघर जिल्हयात पोषण आहार योग्य पध्दतीने पोहोचत नसल्याबाबत

(२२) * ९७३०४ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अजित पवार (बारामती), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयात पोषण आहार योग्य पध्दतीने पोहोचत नसल्याने आदिवासी माता आणि मुलांची अवस्था दयनीय झाल्यामुळे हजारो आदिवासींनी दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास पोलीस अधिक्षक, पालघर कार्यालयावर मोर्चा काढून त्यांच्या मागण्यांचे निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासींच्या निवेदनातील मागण्यांचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, पोषण आहार योग्य पध्दतीने पोहोचविण्याबाबत व त्यांच्या इतर मांगण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय.

(२) कुपोषणाबाबत व बालमृत्यू थांबविण्यासाठी योग्य उपाययोजना करणे.

आदिवासी समाजातील बालके व गरोदर माता कुपोषणाने व बेकारीने दिवसेंदिवस दगावत आहे या सर्व घटनेस महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस, आदिवासी विकास मंत्री मा.ना.विष्णु सावरा तथा पालकमंत्री व अध्यक्ष आदिवासी विकास मंडळ महाराष्ट्र राज्य यांचेवर फसवणुक व मृत्युस जबाबदार असल्याबाबत गुन्हा दाखल करणे या मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे.

(३) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत पालघर जिल्हयामध्ये ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना तसेच गरोदर माता यांना THR आणि वय वर्ष ३ ते ६ या वयोगटातील बालकांना ताजा गरम आहाराचे वितरण नियमितपणे सुरु आहे.

जिल्हयात भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम ही योजना गरोदर व स्तनदा मातांसाठी राबविली जात आहे. या योजनेंतर्गत दररोज एकवेळचा चौरस आहार व टप्पा २ अंतर्गत ६ महिने ते ६ वर्षे वयाच्या बालकांना आठवडयातुन ४ वेळा प्रति दिन एक उकडलेले अंडे व २ केळी असा आहार देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात वन विभागात वन अधिकाऱ्यांसह इतर कर्मचाऱ्यांची २२०० पदे रिक्त असल्याबाबत

(२३) * ९६१७७ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन विभागात वन अधिकाऱ्यांसह इतर कर्मचाऱ्यांची सुमारे २२०० पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरुन वन विभागाचा कारभार सुरळीत होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) होय, सप्टेंबर, २०१७ अखेर वन विभागात २२०१ पदे रिक्त आहेत.

(२) वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०२.०६.२०१५ व दि.१५.०१.२०१६ अन्वये सरळ सेवेच्या कोट्यातील रिक्त असणाऱ्या पदांपैकी ५०% किंवा एकुण संवर्गाच्या ४% यापैकी जे कमी असेल इतकीच पदे भरण्याचे निर्देश आहेत. तसेच गट-क व गट-ड संवर्गामधील ज्या संवर्गाची मंजूर पदसंख्या फारच कमी आहे, अशा संवर्गातील मंजूर पदसंख्येच्या ४% पदे ही ० किंवा १ येत असल्याने सदर संवर्गातील रिक्त पदे सरळ सेवा भरती प्रक्रियेद्वारे भरता येत नाहीत.

पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने सामान्य प्रशासन विभागाने दि.०२/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवली असल्याने सद्य:स्थितीत क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी / कर्मचारी यांची रिक्त पदे पदोन्नतीने भरता येत नाहीत.

(३) भारतीय वन सेवा अधिकाऱ्यांची रिक्त पदे उपलब्ध अधिका-यांमधून पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने सामान्य प्रशासन विभागाने दि.२/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवली असल्याने सदर प्रकरणी होणाऱ्या निर्णयानुसार क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी / कर्मचाऱ्यांची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सरळसेवेद्वारे सहा. वनसंरक्षक संवर्गातील ११ पदे फेब्रुवारी २०१८ अखेर, तसेच वनक्षेत्रपालांची १९५ रिक्त पदे मार्च २०१८ अखेर प्रशिक्षणाअंती उपलब्ध होणार आहेत.

वित्त विभाग शासन निर्णय दि.२.६.२०१५ व दि.१५.१.२०१६ मधील रिक्त पदे भरण्याच्या निर्बंधास अनुलक्षून विभागामार्फत क्षेत्रिय स्तरावरील सहा. वनसंरक्षक, वनक्षेत्रपाल, वनरक्षक, लेखापाल व लिपीक या संवर्गातील दरवर्षी रिक्त होणारी पदे पुढील ३ वर्षे १०० टक्के भरण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन / वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात साथीच्या आजारांमध्ये झालेली वाढ

(२४) * ९५२८७ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), डॉ.राहूल आहेर (चांदवड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जानेवारी ते जुलै, २०१७ या सात महिन्याच्या कालावधीत मलेरियाचे ४५६३, स्वाईन फ्लूचे २७३८, डेंग्युचे ६०० पेक्षा जास्त, चिकनगुनियाचे २१६६ तर हत्तीरोगाचे ७४,५४२ रुग्ण आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार मलेरिया, डेंग्यु, चिकनगुनिया, हत्तीरोग व स्वाईन फ्ल्यू या आजारांवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात जानेवारी ते जुलै २०१७ या सात महिन्यात मलेरियाचे ८२५५, स्वाईन फ्ल्यूचे ३५१३, डेंग्यूचे ७१८, चिकनगुनियाचे २२२ रुग्ण आढळून आले आहेत. हत्तीरोगाच्या वार्षिक सर्वेक्षणानुसार सन २०१७ मध्ये राज्यात हत्तीरोगाचे ६४४५० रुग्ण आढळून आले.

(२) राज्यात साथरोग परिस्थितीचा आढावा वेळोवेळी घेण्यात येतो.

(३) मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया, हत्तीरोग आणि स्वाईन फ्ल्यू या आजारावर नियंत्रण आणण्यासाठी खालील उपाययोजना राबविण्यात येतात.

१. महाराष्ट्र राज्य संसर्गजन्य आजार नियंत्रण समितीकडून आजारांचा आढावा घेऊन रोग प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात.

२. नियमित साथरोग सर्वेक्षण.

३. किटकजन्य आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण.

४. रुग्णोपचारासाठी पुरेसा औषधसाठा.

५. निदानासाठी प्रयोगशालेय सुविधा.

६. मलेरिया रुग्णांवर राष्ट्रीय औषध धोरणानुसार समूळ उपचार

७. किटकजन्य आजारांसाठी एकात्मिक किटक व्यवस्थापन

८. मलेरिया संवेदनशील भागात वर्षातून दोन वेळा किटकनाशक फवारणी.

९. हत्तीरोग दूरीकरणासाठी प्रभावित भागात एकदिवसीय सामुदायिक औषधोपचार मोहिमेचे आयोजन.

१०. हत्तीरोगामुळे अंडवृध्दी झालेल्या रुग्णांसाठी मोफत शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन.

११. इन्फ्ल्यूएंझासाठी अतिजोखमीच्या व्यक्तींना मोफत व ऐच्छिक लसीकरण.

१२. डासोत्तपत्ती रोखण्यासाठी लोक सहभाग.

१३. आंतरविभागीय समन्वय.

१४. विविध साथरोग प्रतिबंधासाठी जनतेचे आरोग्य शिक्षण.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयात कर्करोग रुग्ण सेवा विभाग व ऑक्सीजन प्लँट कार्यान्वीत करणेबाबत

(२५) * ९५०६० श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नॅशनल कॅन्सर ग्रीड सेंटर उभारणीकरीता सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पामध्ये १२६ कोटी रुपयांची तरतूद केली असून त्यामध्ये छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, कोल्हापूर तसेच पुणे, मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे असलेल्या वैदयकीय महाविद्यालयांचा समावेश असताना छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, कोल्हापूर याठिकाणी नॅशनल कॅन्सर ग्रीड सेन्टर उभारण्याबाबतचे काम अद्याप सुरु न झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या रुग्णालयात १ कोटी रुपये निधी खर्च करून कार्यान्वीत करण्यात येणाऱ्या ऑक्सीजन प्लँट चे कामही अद्याप सुरू झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयात कर्करोग रुग्णसेवा विभाग कार्यान्वित करण्याबाबत व ऑक्सीजन प्लँट सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) हे खरे नाही, टाटा ट्रस्ट यांच्याशी केलेल्या सामंजस्य करारानुसार नॅशनल ग्रीड अंतर्गत राज्यातील विविध रुग्णालये नोंदणीकृत करण्यात आली आहेत. त्यामध्ये छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयाचा समावेश आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नॅशनल कॅन्सर ग्रीड अंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापकांना टाटा कर्करोग रुग्णालयाच्या माध्यमातून कर्करोग उपचारांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर योजनेत सदर संस्थेचे नाव समाविष्ट आहे. संस्थेत ऑक्सिजन प्लँट सुरू करणेबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळात कोट्यवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार

(२६) * ९९८८८ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळात कर्जवाटपासह विविध प्रकरणांमध्ये गेल्या पाच वर्षांत कोट्यवधी रुपयांचे गैरव्यवहार झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच लातूर जिल्हयातील वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळ कार्यालय, लातूर अंतर्गत शासनाचा आलेला निधी बेकायदेशीरपणे वाटप करुन सुमारे ३ कोटी ६८ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरेआहे काय,
(३) असल्यास, पाच लाख रुपयांचे कर्ज एकाच व्यक्तीला वेगवेगळया जिल्हयात वाटप करण्यात आले असुन या महामंडळांतर्गत देण्यात येणारे कर्ज ज्या व्यक्तीच्या नावे उचलण्यात आले त्या व्यक्तीना न देता गारमेंट कंपन्या, इलेक्ट्रिकल साहित्याचे विक्रेते यांना देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे : (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) मुंबई आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडे गुन्हा रजिस्टर नं.६८९/२०१७, दि.७.११.२०१७ रोजी भा.दं.वि.स. कलम १७०, १८६, १८९, ४०९, ४१६, ४२०, ४४१, ४६९, ४६६, ४६७, ४६८, ५०४, ५०६, १२० (ब) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच महामंडळाच्या लातूर कार्यालयाअंतर्गत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी लातूर येथील गांधी चौक पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. ५०५/२०१७, दि.३.११.२०१७ रोजी भा.दं.वि.स. कलम ४०९, २०१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतचा पोलीस तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील समुद्रकिनारी मुलभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत

(२७) * ९९९०७ श्री.संजय कदम (दापोली) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील समुद्रकिनारी येणाऱ्या देशी-विदेशी पर्यटकांची गर्दी वाढत असताना समुद्रकिनारे अस्वच्छ असून समुद्रकिनाऱ्यांवर मुलभूत सुविधांचा अभाव असल्याचे दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समुद्रकिनाऱ्यांवरील मुलभूत सुविधांच्या अभावामुळे पर्यटकांची संख्या कमी होऊन स्थानिकांच्या रोजगाराची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दापोली तालुक्यातील समुद्रकिनारे स्वच्छ करुन समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल : (१) व (२) नाही.
(३) व (४) दापोली तालुक्यातील कोळथरे या समुद्रकिनारी ४ टॉयलेट, २ चेंजिंग रुम्स, २ कचरा कुंड्या, आंजर्ले या समुद्रकिनारी चेंजिंग रुम, शौचालय, माहिती फलक, बेंचेस, कचराकुंडी, केळशी या समुद्रकिनारी बेंचेस, कचराकुंड्या, ओपन जीम, गार्डन, मुरुड या समुद्रकिनारी बेंचेस, कचराकुंड्या तर हर्णे या समुद्रकिनारी बेंचेस इ.मुलभूत सुविधा उपलब्ध आहेत. तसेच पर्यटकांना पिण्याच्या पाण्याची सोय, किनाऱ्यापर्यंत रस्ता, मुलांना खेळण्यासाठी बगीचा, समुद्रकिनारा स्वच्छता, माहिती फलक, प्रथमोपचार किट, सौर पथदीप, सागरी सुरक्षा साहित्य इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

सप्टेंबर, २०१६ पासून आतापर्यंत दापोली तालुक्यातील सर्व समुद्रकिनाऱ्यांच्या ठिकाणी किमान ३ ते ४ वेळा विशेष स्वच्छता अभियान राबवून किनारे स्वच्छ करण्यात आलेले आहेत.

राज्यात साथीच्या आजारांची पॅथॉलॉजीद्वारे समान दराने तपासणी करण्यात येत नसल्याबाबत

(२८) * ९५५६५ श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संदीप नाईक (ऐरोली), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.विलास तरे (बोईसर),

श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी डेंग्यू तसेच इतर साथीच्या आजारांच्या तपासण्यासाठी खाजगी पॅथॉलॉजींकडून वेगवेगळे दर आकारले जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या आदेशान्वये तपासण्यासाठी प्रत्येकी ६०० रुपयांपेक्षा जास्त शुल्क आकरण्यात येऊ नये असे स्पष्ट निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाचे स्पष्ट आदेश असतानाही रुग्णांकडून खाजगी पॅथॉलॉजीमध्ये तपासणीसाठी प्रत्येकी ६०० रुपयांपेक्षा ८०० ते १५०० रु. जास्त शुल्क आकारीत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णांची आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी शासनाच्या आदेशाची दरपत्रिका प्रत्येक खाजगी पॅथॉलॉजीमध्ये लावण्याबाबत तसेच समान दराने आजारांच्या तपासण्या करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे.

डेंग्यू निदानासाठी शासन निर्णयाप्रमाणे निश्चित शुल्क आकारण्याच्या सूचना खाजगी पॅथॉलॉजींना देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णय हा केवळ डेंग्यू आजाराच्या विशिष्ट तपासणीबाबत आहे.

(२) होय.

शासनाकडून डेंग्यू निदानासाठी Dengue NS१ ELISA/MAC ELISA चाचणीसाठी कमाल रु.६००/- शुल्क आकारण्याबाबत चा शासन निर्णय झाला आहे.

(३) होय. मुंबईतील एका खाजगी पॅथॉलॉजीमध्ये डेंग्यू चाचणीसाठी ६०० रुपयांपेक्षा जास्त शुल्क आकारल्याची बाब एका तक्रारीद्वारे निदर्शनास आली आहे.
(४) राज्यामध्ये तसेच मुंबई महानगर पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत डेंग्यू निदानासाठी Dengue NS१ ELISA/MAC ELISA या चाचणीसाठी कमाल रु.६००/- शुल्क आकारण्याबाबत चा शासन निर्णय खाजगी प्रयोगशाळेचे संबधीत अधिकारी यांना निर्गमित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नळवाडी (ता.सिन्नर, जि.नाशिक) शिवारातील म्हाळुंगी नदीवरील बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत

(२९) * ९५३९६ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नळवाडी (ता.सिन्नर, जि.नाशिक) शिवारातील म्हाळुंगी नदीवरील बंधारा मागील वर्षात झालेल्या अतिवृष्टीमुळे पुरात वाहून गेला असून सदर बंधाऱ्यांची वर्षभरानंतरही दुरुस्ती न झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे नळवाडी, चास, कासारवाडी येथील शेकडो एकर जमीन सिंचनाखाली आणणाऱ्या या बंधाऱ्यात दुरुस्ती अभावी पाणीसाठा होत नसल्याने तीनही गावच्या शेतकऱ्यांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बंधारा दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे : (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) होय, हे अंशत: खरे आहे.

सन १९९२-९३ मध्ये नळवाडी ता.सिन्नर येथे म्हाळुंगी नदीवर दगडी बंधारा बांधण्यात आला होता. परंतु दिनांक ०१/०८/२०१६ व ०२/०८/२०१६ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे म्हाळुंगी नदीवरील बंधाऱ्याचे खालच्या बाजुचे दगड निखळल्यामुळे नदी पात्रातील २५ मीटर बंधाऱ्याचा भाग वाहून गेला आहे. तसेच बंधाऱ्याच्या पायाचा बराचसा भाग अतिवृष्टीमुळे व पुराच्या पाण्याने कमकुवत झाला आहे. त्यामुळे सदयस्थितीत सदर बंधाऱ्याची दुरूस्ती करणे शक्य नसून सदर ठिकाणी पुन्हा नवीन बंधाऱ्याचे बांधकाम करणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वेक्षण-अन्वेषण करून अंदाजपत्रक व आराखडा करण्याचे काम कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (पुर्व) विभाग, जिल्हा परिषद, नाशिक कार्यालयात प्रगतीपथावर आहे.

निफाड (जि.नाशिक) उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून नवीन रुग्णालय बांधण्याबाबत

(३०) * १०१२९१ श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि.नाशिक) उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून १०० खाटांचे नवीन रुग्णालय बांधण्यास मंजुरी देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत एक महिन्याच्या आत मंजुरी देण्याचे आश्वासन मा.संचालक, आरोग्य सेवा यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून नवीन रुग्णालय बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) दिनांक ३०.११.२०१७ रोजी शासनास प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कळे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील कुंभी-धामणी नदीवरील बंधाऱ्याची झालेली दुरवस्था

(३१) * ९९९९० श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील कुंभी-धामणी नदीवरील बंधारा सुमारे ६० वर्षे जुना असून बंधाऱ्याची दुरवस्था झाली असून सदर बंधाऱ्याच्या पाणीसाठ्यावर धरणसंस्थेच्या कार्यक्षेत्रातील ३० गावे व कार्यक्षेत्राबाहेरील २० गावातील शेतीसह पिण्याच्या पाण्याची सोय अवलंबून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधारा जीर्ण झाला असल्याने आजूबाजूच्या ५० गावांवर भीषण पाणीसंकट निर्माण होऊन सुमारे ४० हजार एकर शेतीचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्याची पाहणी शासनाने केली आहे काय व त्यानुसार कुंभी-धामणी नदीवरील बंधारा दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) होय.

(२) हे खरे नाही. सदर बंधारा हा खाजगी बंधारा असून कुंभी प्रकल्पांतर्गत इतर को.प. बंधाऱ्याच्या साखळीमध्ये आहे. त्यामुळे सतत पाणीपुरवठा होत असतो.

(३) खाजगी बंधारा असल्याने बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत शासनाकडून कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील रुग्णालयांच्या करण्यात आलेल्या तपासणी मोहिमेबाबत

(३२) * ९८९५१ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगलीतील म्हैसाळ प्रकरण घडल्यानंतर राज्य कुटुंब कल्याण कार्यालयाने महापालिका, नगरपालिका आणि ग्रामपंचायत या तीन स्तरावर राज्यातील सर्व वैद्यकीय संस्थांची दिनांक १५ एप्रिल ते ३० एप्रिल, २०१७ या कालावधीत तपासणी करण्यात आली असता एकूण ३७ हजार ६८ वैद्यकीय संस्थांपैकी ६ हजार ७४२ संस्थांमध्ये वैद्यकीय क्षेत्रासाठी आवश्यक असणारे नियम व २ हजार ८४ वैद्यकीय संस्थांनी वैद्यकीय कर्मचाऱ्यांसाठी असणारे नियम पाळले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरहू तपासणी मोहिमेद्वारे राज्यात ८४ पेक्षांही अधिक बोगस डॉक्टर आढळून आले त्यापैकी केवळ सात जिल्हयातील फक्त १८ डॉक्टरांवर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत संबधित दोषी वैद्यकीय संस्थांवर व डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील सर्व दवाखाने/रुग्णालयांच्या तपासणीची धडक मोहिम दिनांक १५/३/२०१७ ते दि.३१/५/२०१७ या कालावधीमध्ये राबविण्यात आली आहे.

दि.३१/५/२०१७ अखेर राज्यामध्ये ३७०६८ Clinical Establishments (केंद्रांची) तपासणी करणेत आली. यापैकी ६७४२ केंद्र अथवा रुग्णालयांमध्ये विविध कायद्यातील तरतूदींनुसार त्रुटी आढळून आल्या आहेत.

२०८४ वैद्यकीय संस्थांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण कायदा पालन न केल्याचे आढळून आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

तपासणी पथकाने केलेल्या तपासणीमध्ये ८१ बोगस डॉक्टर आढळून आले आहेत. त्यापैकी २० डॉक्टरांवर एफ.आय.आर दाखल करण्यात आले आहे. उर्वरीत प्रकरणी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समिती मार्फत नोटिसा देण्यात आल्या आहेत. प्राप्त खुलास्यांवर जिल्हा स्तरीय समितीमध्ये चर्चा करुन अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

(३) तपासणी पथकांनी तपासणीत आढळलेल्या त्रुटी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीसमोर ठेवल्या.

- जिल्हा स्तरीय समितीने नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार संबंधित केंद्रांना कारणे दाखवा नोटीसा देऊन आपले म्हणने विहीत मुदतीत मांडण्याची संधी दिली आहे.
- समितीने शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र प्रॅक्टीशनल ॲक्ट या कायदयाचे उल्लघंन केल्याचे आढळून आल्याने २० बोगस डॉक्टरांवर व २ बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायदा अंतर्गत, १ क्रॉस पॅथी, १ फायर रेग्यूलेशन असे एकूण २४ डॉक्टरांवर एफ.आय.आर दाखल करण्यात आली आहे.
- १६९ वैद्यकीय संस्थांना दंड करण्यात आला आहे.
- २७ दवाखाने बंद करण्यात आले आहे.
- वैदयकिय गर्भपात कायदा १९७१ या कायदयामध्ये प्रथम दर्शनी उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यामुळे या कायदयातील तरतूदीं अन्वये ४ केंद्रे बंद करण्यात आली आहेत.
- गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) या कायदयाचे उल्लघंन झाल्यामुळे ५ सोनोग्राफी मशीन सील करण्यात आली आहेत.
- ३ वैद्यकीय संस्थांना ताकीद देण्यात आली आहे.
- ५ प्रकरणे पोलिस व अन्न व औषध प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील ई-निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

(३३) * ९५७२७ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद पंचायत समितीस्तर व ग्रामपंचायत स्तरावरील विकासकामांची ई-निविदा प्रक्रिया पारदर्शी राबवून कंत्राटदारांकडून अनामत रक्कम व सुरक्षा ठेव रक्कम राष्ट्रीयकृत बॅकेत शासन जमा करणे शासन निर्णयानुसार अनिवार्य असताना सन २०१३ ते २०१७ या आर्थिक वर्षात नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामपंचायत सचिवांनी सदर ई-निविदा प्रक्रिया न राबविता संबंधित कंत्राटदारासोबत संगनमत करुन कोटयवधी रुपयांची बनावट विकास कामे केल्याचे दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार जिल्हा परिषद पंचायत समितीस्तर व ग्रामपंचायत स्तरावरील विकासकामांच्या ई-निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित ग्रामपंचायत सचिव आणि कंत्राटदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) संबंधित ग्रामपंचायत स्तरावर राबविलेल्या ई-निविदा प्रक्रियेबाबतची नस्ती व ई-निविदा पूर्ण केल्याची माहिती जिल्हा परिषद स्तरावर मागविण्यात आलेली आहे.

सदर बाबतीत संबंधित ग्रामपंचायतीचे सचिव यांचे कडून विहीत मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने संबंधित सर्व सचिवांना पंचायत समिती कार्यालयाने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच चौकशी करीता पथक गठीत करण्यात आले आहे. सदर बाबतीत अनियमितता आढळून आल्यास संबंधित ग्रामपंचायत सचिवा विरुध्द नियमानुसार प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

निविदा न काढता अंगणवाड्यांना आहार पुरवठा करण्याचे देण्यात आलेले कंत्राट रद्द करण्याबाबत

(३४) * १००८९५ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाड्यांना आहार पुरवठा करण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून महिला संस्थांच्या माध्यमातून पुरवठा करणेबाबत दिनांक २५ जुलै, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार वाटप करण्याचे निर्देश असताना १४ जिल्ह्यांमध्ये मात्र निविदा न काढता आहार पुरवठा करण्याबाबत महिला साहस संस्था, सोलापूर व जननी महिला मंडळ, पुणे यांना बेकायदेशीरपणे काम देण्यात आल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिला साहस संस्था, सोलापूर व जननी महिला मंडळ, पुणे यांना निविदा न काढता बेकायदेशीरपणे देण्यात आलेला कंत्राट रद्द करून कारवाई करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, राज्याचे मुख्य सचिव व आयुक्त एकात्मिक सेवा योजना यांचेकडे लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या पत्राव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन संबंधितांचे कंत्राट रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

राज्यामध्ये ग्रामीण भागामध्ये एकुण ८१८५८ इतक्या अंगणवाडया कार्यरत असून ३८३३५ अंगणवाडी केंद्राचे बचतगटांनी काम सोडून दिलेले आहे. तथापी मा. सर्वोच्च न्यायालयाचे रिट पिटीशन नं. १९६/२००१ मध्ये दिनांक ०७.१०.२००४ रोजी दिलेल्या आदेशानुसार वर्षातून किमान ३०० दिवस आहार पुरवठा करणे बंधनकारक असल्यामुळे पर्यायी व्यवस्थेअंतर्गत १.जननी महिला संस्था यांना रायगड, २.अहमदनगर, ३.पुणे या जिल्हयात व महिला साहस संस्थेस १.लातुर, २.कोल्हापूर, ३.सोलापूर या जिल्हयात ज्या ठिकाणी स्थानिक बचतगटांनी आहार पुरवठा आदेश देण्यात आले आहेत.
(२) होय.

सदर कामाची चौकशी करण्यात आलेली असून सदर काम हे पर्यायी व्यवस्थे अंतर्गत सन २०१३ पासून देण्यात आले असून नवीन टेंडर न झाल्यामुळे लाभार्थी आहारापासून वंचीत राहू नये करीता काम सुरु ठेवलेले आहे.

(३) महिला साहस या संस्थेच्या आहाराच्या दर्जाबाबत ३ अधिकाऱ्यांचे तपासणी पथक पाठवून तपासणी करण्यात आली असून आहाराचा दर्जा उत्तम असल्याबाबत अहवाल प्राप्त झालेला आहे. तथापी राज्यातील सर्व जुन्या गरम ताजा आहार पुरवठाधारकांची महिला मंडळ/ बचतगट/ महिला संस्थांची मुदत संपल्यामुळे दिनांक १७ जुलै, २०१७ रोजी पुरवठयासाठी निविदा प्रकाशित करण्यात आली आहे. सदर निविदेची प्रक्रिया पुर्ण झालेली आहे. तथापी सदर निविदेसंदर्भात मा.उच्च न्यायालयात ४ रिट याचिका दाखल झालेल्या आहेत. सदर याचिकेमध्ये पुरवठा आदेश देण्याबाबत स्थगिती दिलेली असल्यामुळे अद्याप नवीन पुरवठाधारकांची नेमणुक करण्यात आलेली नाही.
(४) लागु नाही.

रायगड जिल्हयातील ५९ गावांच्या पर्यटन विकास आराखड्याला मंजूरी देण्याबाबत

(३५) * ९७१६६ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील ५९ गावांच्या पर्यटन विकासासाठी प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत २४३ कोटींचा विकास आराखडा तयार करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्हयातील ५९ गावांच्या पर्यटन विकासाचा आराखडा तयार करण्यासाठी कन्सल्टंन्ट इंजिनिअर सर्व्हीसेस, पुणे या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१३-१४ मध्ये सदर आराखडा शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात आलेला असून शासनाने अद्यापपर्यंत मंजूरी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रायगड जिल्हयातील ५९ गावांच्या पर्यटनाचा विकास करण्याच्या दृष्टीने पर्यटन विकासाचा आराखडा मंजूरीसह शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल : (१) व (२) होय. मात्र सदर आराखडा पर्यटन स्थळांचा आहे.
(३), (४) व (५) रायगड जिल्ह्याच्या पर्यटन विकास आराखड्याबाबत शासन निर्णयास मान्यता घेणे व तो निर्गमित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

नांदेडसह मराठवाडयातील शेततळ्यांची कामे पूर्ण करण्याबाबत

(३६) * ९९३६० श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयात ५ हजार शेततळयांचे उद्दिष्ट असताना केवळ ५९९ शेततळयांचे काम पूर्ण झाली असून उर्वरित शेततळयांचे काम अद्यापी पूर्ण करण्यात येत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच मराठवाडा विभागात ३९ हजार ४०० शेततळी तयार करण्याचे शासनाचे उद्दिष्ट असताना प्रत्यक्षात केवळ ४ हजारच शेततळी पूर्ण करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार नांदेडसह मराठवाडयातील शेततळयांची उर्वरित कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल : (१) हे खरे नाही.
जिल्हयास ५००० शेततळयांचा लक्षांक प्राप्त झाले होते. परंतु मे २०१७ अखेर सुधारित लक्षांक ४००० झाला असुन त्यापैकी माहे ऑक्टोबर, २०१७ अखेर ११४३ शेततळे पुर्ण झाले होते. दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ अखेर ११४७ शेततळे पुर्ण झाले आहेत.
(२) हे खरे नाही.

मराठवाडा विभागात एकुण ३९,६०० शेततळ्यांचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी दिनांक २३/११/२०१७ अखेर मराठवाडा विभागात मागेल त्याला शेततळे योजनेंतर्गत २०७४२ शेततळे पुर्ण करण्यात आले आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

मौजे तळवाडे-भामेर (ता.बागलाण, जि.नाशिक) येथे बिबट्याने अडीच वर्षीय मुलाचा घेतलेला बळी

(३७) * ९५०३३ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तळवाडे-भामेर (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील शिवारात मेंढराच्या वाघरात झोपलेल्या अडीच वर्षीय मुलाला बिबट्याने ठार मारल्याची घटना दिनांक २१ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, तदनुसार बिबट्याने ठार मारलेल्या मुलाच्या कुटूंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) मौजे तळवाडे (भा.) येथे दिनांक २१.१०.२०१७ रोजी मालकी गटक्रमांक २६२ मध्ये बिबट्याच्या हल्ल्यात चि. कोमल नामदेव नामदास या मुलाचा मृत्यु झाला आहे हे खरे आहे.
(२) व (३) प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार मृत मुलाचे कायदेशीर वारस आई व वडील यांच्या संयुक्त खात्यावर धनादेशाद्‍वारे रु. १.०० लाख अदा करण्यात आले असून रु.७.०० लाख वारसांच्या नावाने मुदत ठेव (Fixed Deposit) जमा करण्यात आले आहे. असे एकूण रु.८.०० लक्ष अर्थिकसहाय्य मृतकाच्या वारसास अदा करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील संत गाडगेबाबा निर्वाण भूमी आराखडातंर्गत मंजूर कामे व नवीन कामाकरीता निधी मिळण्याबाबत

(३८) * ९७२३२ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील संत गाडगेबाबा निर्वाण भूमी आराखडा अंतर्गत मंजूर कामे व नवीन कामांकरीता ३.९८ कोटी रुपयांचा वाढीव निधी मंजूर करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २९ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार संत गाडगेबाबा निर्वाण भूमी आराखडा अंतर्गत मंजूर कामे व नवीन कामांकरीता वाढीव निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) होय.

(२) व (३) सन्माननीय लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेला वाढीव निधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

राज्यातील अंगणवाड्यांना बचत गटांमार्फत पोषण आहार देण्याबाबत

(३९) * ९८३३२ ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ९२ हजाराहून अधिक अंगणवाडयांपैकी फक्त २३ हजार अंगणवाडयांमध्ये बचत गटांमार्फत पोषण आहार देत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार राज्यातील अंगणवाड्यामध्ये बचत गटांमार्फत पोषण आहार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय.

राज्यात एकूण ९७३७२ अंगणवाड्या कार्यरत असून त्यापैकी ग्रामीण भागात ८१८५८ व नागरी भागात १५५१४ अंगणवाडया कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील अंगणवाडयांपैकी ५५५३२ अंगणवाडयांमध्ये स्थानिक महिला मंडळ / बचत गटांमार्फत गरम ताजा आहाराचा पुरवठा सुरु आहे. उर्वरित ३८३३५ अंगणवाडयांमध्ये बचतगटांनी स्वत: वेळोवेळी काम सोडून दिल्यामुळे पर्यायी व्यवस्थेअंतर्गत महिला संस्थांमार्फत कच्च्या धान्याचा पुरवठा करण्यात येतो.
(२) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) राज्यात ग्रामीण भागातील सर्व अंगणवाडयांना एकसारखा पोषणआहार पुरवठा होण्याच्या दृष्टीकोनातून दिनांक १७ जुलै, २०१७ रोजी पोषण आहाराची निविदा प्रकाशित करण्यात आली आहे. तथापि, सदर निविदेसंदर्भात मा.उच्च न्यायालयात ४ रित याचिका दाखल झालेल्या आहेत. सदर रिट याचिकेबाबत पुरवठा आदेश देण्यास न्यायालयाने स्थगन आदेश दिलेला आहे. न्यायालयाच्या पुढील आदेशाप्रमाणे निविदा प्रक्रियेबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज तालुक्यातील उप जिल्हा रुग्णालय तसेच चंदगड तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाच्या दुरवस्थेबाबत

(४०) * ९६७०६ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज तालुक्यात १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय असूनही या रुग्णालयात अतिदक्षता विभाग, रक्तपेढी व सोनोग्राफी सेंटर या सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना तातडीच्या उपचारासाठी बेळगांव किंवा कोल्हापूर येथे जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) तसेच चंदगड तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयामध्ये कर्मचारी, वैद्यकिय अधिकारी, फार्मासिस्ट व नर्सेसची संख्या आवश्यकतेनुसार नसून ऑपरेशन थिएटर, सोनोग्राफी सेंटर व ब्लड बँक या आवश्यक सोई-सुविधा नसल्याने रुग्णांना आरोग्याच्या सुविधा योग्य प्रकारे मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्तबाबतच्या सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार उप जिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि.२८.०७.२०१७ चे पत्र प्राप्त झाले आहे.
(४) कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात अतिदक्षता विभाग कार्यरत आहे. तेथे रक्त साठवणूक केंद्र उपलब्ध आहे. तसेच या रुग्णालयात दर मंगळवारी खाजगी स्त्रीरोगतज्ञ व दर गुरुवारी खाजगी रेडिओलॉजिस्ट यांना बोलावून सोनोग्राफी केल्या जातात.

चंदगड तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाकरीता २७ पदे मंजूर असून, त्यापैकी ६ पदे रिक्त आहेत. औषध निर्माता हे पद आय.पी.एच.एस. अंतर्गत भरण्यात आलेले आहे. या रुग्णालयामध्ये ऑपरेशन थिएटरची सुविधा उपलब्ध आहे. तसेच सोनोग्राफी सेंटरच्या प्रस्तावाचा पाठपुरावा सुरु आहे. या रुग्णालयाकरीता ब्लड बॅंक मंजूर झाली असून अन्न व औषध प्रशासन यांनी जागेच्या नकाशास मंजूरी दिली आहे. सदर केंद्राकरीता साहित्य सामुग्रीसाठी मागणी करण्यात आली आहे. सद्या अत्यावश्यक सेवा भासल्यास उपजिल्हा रुग्णालय, गडहिंग्लज यांचेकडून रक्त पुरवठा केला जातो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पलसगड (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) ग्रामपंचायतमध्ये तेंदूपाने संकलन कंत्राटाच्या लिलाव प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

(४१) * १०११७६ श्री.चरण वाघमारे (तुमसर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत पलसगड पंचायत समिती कुरखेडा (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील तेंदूपाने संकलन कंत्राटाच्या लिलाव प्रक्रियेत गैरव्यवहार झाला असल्याने ग्रामसभेने सदर ग्रामपंचायतीला ताला ठोको आंदोलन दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहारामुळे मजुरांना तेंदूपत्ता संकलनाचा दर कमी मिळाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) दिनांक १२.९.२०१७ रोजी पलसगड ग्रामपंचायतीला ताला ठोकण्यात आला ही बाब खरी आहे. परंतु या दिवशी ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले नव्हते. त्यामुळे ग्रामसभेने ताला ठोको आंदोलन केले असे म्हणता येणार नाही.

(२) चौकशीअंती सदर प्रकरणात गैरव्यवहार झाला नसल्याचे आढळून आले. मागील तीन वर्षाच्या सरासरीच्या ५ पटीने दर मिळाले असल्याने मजुरांना तेंदूपत्ता संकलनाचा दर कमी मिळाला हे खरे नाही.

(३) चौकशीअंती सदर प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले नाही. त्यामुळे दोषींवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गुहागर (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रूग्णालयातील एक्स रे व सोनोग्राफी यंत्रणा बंद असल्याबाबत

(४२) * ९५३०६ श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रूग्णालयातील एक्स रे मशीन वर्षभर तर सोनोग्राफी यंत्रणा पाच वर्षांपासून बंद असल्याने गरजू रूग्णांना खासगी रुग्णालयात पैसे खर्च करुन वैद्यकीय उपचार घ्यावे लागत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच या ग्रामीण रूग्णालयातील वैदयकीय अधीक्षक, वैदयकीय अधिकारी, औषध निर्माण अधिकारी यासह अनेक पदे रिक्त असल्याने रूग्णांना योग्यरित्या वैद्यकीय सेवा मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ग्रामीण रूग्णालयाची पाहणी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या ग्रामीण रूग्णालयाला वैद्यकीय यंत्रणा उपलब्ध करुन देण्यासह येथील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे. ग्रामीण रुग्णालय, गुहागर येथील क्ष किरण मशीन डिसेंबर, २०१६ पासून बंद होती परंतु सदर मशीनची दुरुस्ती करुन नोव्हेंबर २०17 पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच सोनोग्राफी मशीन दिनांक २४ मार्च,२००८ रोजी प्राप्त झाली असून सदर मशीनची कार्यक्षमता व आयुर्मान संपलेले असल्याने सोनोग्राफी मशीन्सच्या अहवालात जास्त चुका होण्याची शक्यता असल्याने मशीन सीलबंद केले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. वैद्यकीय अधिकारी यांची ३ पदे मंजूर असून ती कार्यान्वित आहेत. वैद्यकीय अधिक्षक, वर्ग-१ चे पद रिक्त आहे. गट क संवर्गाची १५ पैकी ९ पदे भरलेली असून, ६ पदे रिक्त आहेत. गट ड संवर्गाची ७ पैकी ५ पदे भरलेली असून २ पदे रिक्त आहेत. या व्यतिरिक्त राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी स्वरुपात ६ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. सदर रुग्णालयाच्या एकूण २६ मंजूर पदांपैकी १७ पदे भरलेली असून ९ पदे रिक्त आहेत.

(३) जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांनी सदर रुग्णालयाची या वर्षात माहे जानेवारी, मे व ऑक्टोबर महिन्यात पाहणी केली असून कामकाजाबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.

(४) गट-क संवर्गातील रिक्त असलेली पदे उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर तसेच वर्ग-ड संवर्गातील रिक्त पदे जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांचे स्तरावरुन भरण्याची कार्यवाही सुरु आहे. सफाईगार हे पद रिक्त असले तरी सदर पदावर कंत्राटी सफाईगार कार्यरत आहे. वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१ व वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर, पुणे व जळगांव जिल्हयातील विविध तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची झालेली दुरवस्था

(४३) * ९७९३८ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राहूल कुल (दौंड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील निंबोडी गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या वर्गाचे छत कोसळून माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये तीन विद्यार्थ्यांचा मृत्यु झाला असून नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील नादुरुस्त व धोकादायक २० शाळेतील वर्ग खोल्यांमधील तीन हजार विद्यार्थी धोकादायक शाळांमध्ये शिक्षण घेत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे जिल्हयातील विविध तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या ८८ इमारती अत्यंत धोकादायक असल्याचा अहवाल युडायसने दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजी सादर केला आहे तसेच जिल्हयातील भोर ७३, आंबेगाव ३९, बारामती ७, दौंड २४, हवेली ४२, इंदापूर १७, जुन्नर ४३, खेड ८८, मावळ ४२, मुळशी ३३, पुरंदर ३७, शिरूर २४, वेल्हे ६२ अशा मिळून तब्बल ५३१ शाळांच्या इमारतीची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याचे प्रस्तावही जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच जळगांव जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शाळांचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन शाळा दुरुस्तीबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हयाच्या मा.पालकमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर दुरवस्था झालेल्या शाळांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार या शाळांचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

(४) होय.

(अ) अहमदनगर जिल्हा परिषद शाळांच्या नवीन वर्ग खोल्या व दुरुस्तीसाठी रु.१४५ कोटी ३४ लक्ष १३ हजार इतक्या खर्चाच्या आराखडयाबाबत कार्यवाही सुरु आहे.

(ब) तसेच, पुणे जिल्हयातील तालुकानिहाय खालील प्रमाणे जिल्हा परिषदेच्या शाळा दुरुस्तीचे प्रस्ताव प्राप्त आहे.

(१) भोर ७३, पैकी ४३, (२) आंबेगाव ३९ पैकी २८, (३) बारामती, ७ पैकी ५, (४) दौंड २४ पैकी १४, (५) हवेली ४२ पैकी १७, (६) इंदापूर १७ पैकी १३, (७) जुन्नर ४३ पैकी ३४, (८) खेड ८८ पैकी ३३, (९) मावळ ४२ पैकी ४२, (१०) मुळशी ३३ पैकी ७ (११) पुरंदर ३७ पैकी १७, (१२) शिरुर २४ पैकी ५१ व (१३) वेल्हे ६२ पैकी १७ इतक्या शाळा इमारतींच्या दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे.

(क) त्याच प्रमाणे सन २०१७-१८ करिता जळगांव जिल्हा परिषदेच्या शाळांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीने रु.२.२५ कोटी निधी मंजूर केलेला असून कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

करगणी (ता.आटपाडी, जि.सांगली) येथील ओढ्यावर पिसे वस्ती सिमेंट बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(४४) * ९५६९६ श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करगणी (ता.आटपाडी, जि.सांगली) येथील ओढ्यावर पिसे वस्ती सिमेंट बंधाऱ्याचे मातीमिश्रीत वाळूच्या सहाय्याने निकृष्ट दर्जाचे काम सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निकृष्ट दर्जाचे सुरु असलेले काम तत्काळ थांबवून चांगल्या वाळूने सुरु करावे अशी मागणी शेतकऱ्यांनी तहसिलदारांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, तद्‌नुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) संबंधित उपविभागीय अधिकारी, कंत्राटदार व तक्रारदार यांनी दिनांक ०६/०८/२०१७ रोजी कार्यक्षेत्रावर संयुक्तपणे भेट दिली. त्यानुसार झालेल्या चर्चेत माती मिश्रित वाळू पाण्याने धुवून स्वच्छ करुन Silt content तपासून वाळू वापरास योग्य असल्यास वापरणेस सहमती दिली. सद्यस्थितीत काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रस्तुत संधानक कामाचे त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी तसेच बंधाऱ्याला गळती नसल्याची खात्री करुनच अंतिम देयक ठेकेदारास अदा करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

जत (जि.सांगली) तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना पुनश्च सुरु करण्याबाबत

(४५) * ९४९९७ श्री.विलासराव जगताप (जत), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधील गैरव्यवहार निदर्शनास आल्यानंतर तालुक्यातील रोजगार हमी योजना वर्षभरापासून बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे एक वर्षापासून पूर्ण झालेल्या कुशल व अकुशल कामांचे पैसे लाभार्थ्यांना अद्यापपर्यंत मिळाले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्षभरापासून सदरची योजना बंद असल्याने तालुक्यातील मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जत तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना पुन्हा कधीपासून सुरु करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल : (१) नाही.

जत तालुक्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शेततळे, कंपोष्ट, नाडेप कंपोष्ट, फळबाग, रोपवाटीका, गट लागवड व तुती लागवडची कामे सुरू आहेत. तसेच ग्रामपंचायत यंत्रणामार्फत घरकूल ची कामे सुरू आहेत.

(२) होय.

माहे डिसेंबर, २०१६ मध्ये जत तालुक्यातील ग्रामपंचायत एकूंडी, बाज व काशिलिंगवाडी या गावातील मनरेगा अंतर्गत कामामध्ये अपहार झाल्याने संबंधित गटविकास अधिकारी, सहायक गटविकास अधिकारी, सहायक लेखाधिकारी, कृषी अधिकारी, सहायक कार्यक्रम अधिकारी (APO), ग्रामसेवक यांचेविरुध्द दोन स्वतंत्र फौजदारी गुन्हे दाखल झाल्यामुळे त्यांना निलंबित केले आहे. त्यांचे कालावधीतील प्रलंबित असणारी अकुशल रक्कम रु.३४२.५७ लक्ष व कुशल रक्कम रु.४०४.९५ लक्ष अशी एकूण रु.७४७.५२ लक्ष ची देयके प्रलंबित आहेत.

सदर देयकांची मुळ कागदपत्रे आढळून न आल्याने देयक अदा करणेस विलंब झालेला असून देयक अदा करणेकामी स्थळ पाहणी व फेरमुल्यांकन करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार देयके अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

तसेच पंचायत समिती स्तरावरुन चालू असलेल्या व पुर्ण झालेल्या शेततलाव व माती नाला बांध कामाचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचेमार्फत अकुशल कामाचे फेरमुल्यांकन करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे देयके प्रलंबित आहेत.

(३) नाही.

जत तालुक्यामध्ये मग्रारोहयो अंतर्गत कामे सुरु असून सन २०१७-१८ मध्ये १८४१७ इतकी मनुष्यदिवस रोजगार निर्मिती झाली आहे. सदर कामावरील मजुरांना रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. वैयक्तिक लाभाची कामे तसेच घरकुलाची कामे सध्या सुरु असून अपूर्ण कामे पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्हयात पोषण आहार योजना व ग्राम बालविकास केंद्रातील उपचार योजना राबविल्या जात नसल्याबाबत

(४६) * ९८८३३ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील कुपोषित बाल-माता यांचे मृत्यू रोखण्यासाठी शासनाने राबविलेल्या पोषण आहार योजना व ग्राम बालविकास केंद्रातील उपचार योजना जिल्हा परिषद, अकोला यांच्याकडून न राबविता सेसफंडातील २५ लाख व जिल्हा वार्षिक योजनेतील १२ लाख अखर्चित ठेवल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनांचा निधी वापरण्यात न आल्यामुळे अकोट व तेल्हारा तालुक्यातील ग्रामीण व डोंगरी भागातील बालके, स्तनदा माता, गरोदर स्त्रिया यांचा कुपोषणामुळे मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ग्राम बालविकास केंद्राचा निधी खर्च करण्याची नस्ती तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार जिल्ह्यासाठी शासनाकडून प्राप्त झालेल्या निधी विनियोग न करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) सन २०१७-१८ या वर्षातील जिल्हा परिषद सेस फंडातून अतिरिक्त पोषण आहारासाठी रु.२५ लक्ष मंजूर करण्यात आले आहे. अतिरिक्त पोषण आहार देण्याची योजना राबविण्याची प्रक्रिया सुरु असल्याने मार्च, २०१८ अखेर हा सर्व निधी खर्च होणार आहे.
(२) नाही.

सदर मृत्यू हे कुपोषणामुळे झालेले नसून विविध आजारांमुळे झालेले आहेत.

(३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या संपाबाबत

(४७) * ९५०२० श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल),

श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दोन लाख अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी मानधन वाढ करण्याच्या मागणीसह इतर प्रलंबित मागण्यांसाठी दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी पासून बेमुदत संप पुकारला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडी सेविकांच्या संपकाळात राज्यातील १५ आदिवासी जिल्हयांमध्ये कुपोषण आणि बालमृत्यूची गंभीर स्थिती निर्माण होऊन लाखो बालकांना पोषण आहार मिळू न शकल्याने १२५ बालकांचा मृत्यु तसेच सुमारे अडीच हजार कुपोषित बालके आरोग्य विभागाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त संपातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मागण्या काय आहेत,

(४) असल्यास, उक्त मागण्यांच्या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व सदरहू निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय. हे अंशत: खरे आहे.

(२) होय. हे अंशत: खरे आहे.

पोषण आहार न मिळाल्याने हे बालमृत्यू झाले ही बाब खरी नाही.

(३) अंगणवाडी कर्मचारी संघटनेने खालीलप्रमाणे मागण्या केल्या आहेत.

१. अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांना सन्माननीय जीवन जगण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा, वेतनश्रेणी व अन्य लाभ देण्यात यावेत.

२. अंगणवाडी कर्मचारी २००५ पासून सेवानिवृत्त झाले आहेत त्यांना एकरकमीचा लाभ देण्यात यावा.

३. मिनी अंगणवाडीला पुर्ण अंगणवाडीचा दर्जा द्यावा. दरम्यानच्या काळात मिनी अंगणवाडी सेविकाला समान कामाला समान वेतनाच्या सहायाने सेविकेसारखेच मानधन व इतर सर्व लाभ देण्यात यावे.

४. अंगणवाडीच्या कामासाठी लागणारे सर्व रजिस्टर व अहवाल व इतर सर्व साहित्य शासनाने पुरवावे. जे साहित्य हाताने उचलून नेण्यासारखे नाही. असा सर्व खर्च शासनाने द्यावा, इत्यादी मागण्या.

(४) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र शासनाची योजना आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या निकषांप्रमाणे योजनेचे कामकाज चालते. मानधनामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. मानधनी कर्मचाऱ्यांना वाढवून द्यावयाच्या राज्य हिश्याचे मानधन व इतर सवलती बाबत तरतूद करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील बालगृहांच्या स्वयंसेवी संस्थांना अनुदान मिळण्याबाबत

(४८) * ९६५८६ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागाच्या मान्यतेने राज्यात स्वयंसेवी संस्थांच्या अनुदानित बालगृहात या वर्षी बालकल्याण समितीच्या आदेशाने सुमारे १४ हजार अनाथ, निराधार-निराश्रित बालके वास्तव्यास आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येक बालकाला ९५०/- रुपये सहाय्यक अनुदान शासन स्वयंसेवी संस्थांना देते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहित आगाऊ अनुदान देण्याचे स्पष्ट असतानाही अद्यापी अनुदान वितरित झालेले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार अनुदान तातडीने संस्थांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) राज्यातील बालगृहांमध्ये माहे ऑक्टोबर, २०१७ अखेर काळजी व संरक्षणाची गरज असलेली एकुण १६७१३ बालके बाल कल्याण समितीच्या आदेशाने बालगृहामध्ये दाखल आहेत.
(२) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०११/ प्र.क्र. ४१८/का-८, दिनांक १३ सप्टेंबर, २०१३ नुसार सर्वसाधारण बालगृहांना प्रति बालक दरमाह रुपये १२१५/- एवढे अनुदान देण्यात येते. परंतू ज्या बालगृहांमध्ये बायोमॅट्रीक यंत्रणा बसविण्यात आलेली नाही. तसेच संस्थेतील बालकांची माहिती ट्रॅक चाईल्ड या केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर भरण्यात आलेली नाही अशा संस्थांना प्रति बालक दरमाह रुपये ९५०/- एवढे अनुदान देण्यात येते.
(३), (४) व (५) शासन निर्णय क्र. बालगृ-२०१५/ प्र.क्र.५०/ का-८/ मुंबई दिनांक १३ जुलै २०१५ अन्वये महाराष्ट्र बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२, अंतर्गत असलेल्या तरतूदीनुसार बालगृहांची तपासणी करण्यात आली. सदर तपासणीच्या विरोधात मा. उच्च न्यायालय, खंडपिठ, औरंगाबाद येथे दाखल रिट पिटीशन क्र. ६५७९/२०१५ प्रकरणी दिनांक ०५ मे, २०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार श्रेणीनिहाय वर्गवारीच्या अंतिमीकरणानंतर अ आणि ब श्रेणीतील संस्थांना ७०% सहाय्यक अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात हाडांचा कॅन्सर (अस्थिरोग) रूग्णांसाठी आरोग्य केंद्र प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याबाबत

(४९) * ९५०८६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हाडांचा कॅन्सर (अस्थिरोग) या दुर्मिळ आजाराने बहुसंख्य तरूण मुले त्रासली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १५ ते २९ या किशोरवयीन व तरूणांमध्ये विविध प्रकारच्या कॅन्सरचे प्रमाण वाढत असून कर्करोगाचे निदान झाल्यानंतर रूग्णांना स्वप्रतिमा, स्वयतत्ता, शिक्षण, रोजगार इ. निगडीत बाबींशी मानसिक व शारिरिक कमतरतेच्या दृष्टीकोनातून रूग्णांसाठी खास आरोग्य केंद्र, समाज जागृती, सामाजिक व मानसिक मदत, शिक्षण व व्यवसायभिमुख प्रशिक्षण याबाबी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे नाही.

तथापि, तरुणांमध्ये हाडांच्या कॅन्सरचे प्रमाण वाढत असल्याचे बातमी दि.४.९.२०१७ च्या महाराष्ट्र टाईम्स व टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे. सदर बातमीच्या आधारे टाटा रुग्णालयामार्फत अहवाल मागविण्यात आला होता. त्यानुसार तसेच कॅन्सर रजिस्ट्रीच्या अहवालानुसारही मुलांमध्ये अस्थिरोग कॅन्सरचे प्रमाण वाढल्याचे आढळून येत नाही.

(२) सन २०१२ पासून महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत (पूर्वीची-राजीव गांधी जीवनदायी योजना) १५ ते २९ वयोगटातील ४१११ रुग्णांना मेडीकल आँकॉलॉजी २४३४ रुग्णांना रॅडिकल आँकॉलॉजी व १८६० रुग्णांना सर्जिकल

ऑंकॉलॉजीचे उपचार उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. टाटा मेमोरिअल हॉस्पीटल व राज्य असंसर्गजन्य रोग नियंत्रण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या PPP उपक्रमामार्फत खाजगी कर्करोग तज्ञांची उपचार सेवा, जिल्हा रुग्णालयात मोफत उपलब्ध करुन देण्यात येत आहे, राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत "कॅन्सर वॉरिअर" हा उपक्रम एकूण १९ जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहे. तसेच डिसेंबर, २०१७ या महिन्यात मुख स्वास्थ्य मोहिमेअंतर्गत राज्यभरात तोंडाच्या कर्करोगाबाबत तपासणी व जनजागृती शाळा, कॉलेजेस, हॉस्पीटल व गावपातळीवर करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे राजुर (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील रस्त्याच्या रुंदीकरणासह पुलाचे नुतनीकरण करण्याबाबत

(५०) * ९६०४९ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापुर, सोलापूर महामार्गावरील मौजे राजुर (ता.मोताळा, जि.बुलढाणा) या गावात जाणारा रस्ता अरूंद असून पुलाचे बांधकाम देखील अतिशय जुने झालेले आहे, सदरहू रस्ता योजनाबाहय असल्याने जिल्हा परिषदेच्या कोणत्याही योजनेत समाविष्ट करता येत नसल्याची बाब दिनांक १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त अरूंद रस्त्यामुळे गावात रूग्णवाहीका, अग्निशमन दलाचे वाहन व पोलिसांचे मोठे वाहन इ. आवश्यक सेवा गावाला उपलब्ध होत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्त्याची पाहणी शासनाने केली आहे काय व त्यानुसार रस्त्याच्या रुंदीकरणासह पुलाचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) मौ.राजुर हे गाव मलकापूर सोलापूर महामार्गावर स्थित आहे. मलकापूर सोलापूर महामार्ग क्र.१३ व मौ.राजुर यांच्या मध्ये नळगंगा नदी आहे. नदीवर सद्यस्थितीत दगडी बंधारा असून बंधा-यावर आर.सी.सी. स्लॅब आहे. त्यावरुन सद्यस्थितीत वाहतुक सुरु आहे. बंधारा अरुंद असून त्याचे बांधकाम बरेच जुने असल्याने त्याठिकाणी नवीन पुलाची आवश्यकता आहे.

सदर रस्ता योजनाबाह्य असल्याने बंधाऱ्यासाठी जिल्हा परिषद/शासनाच्या योजनेमधून निधी उपलब्ध होवू शकत नाही. त्यासाठी शासन परिपत्रक दि.२०.७.२०१६ अन्वये सदर रस्ता योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबतची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे कडूस, बिबी व गारगोटवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील नदी पुनरुज्जीवन अंतर्गत सिमेंट बंधाऱ्यांची कामे रद्द केल्याबाबत

(५१) * १००३८६ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कडूस, बिबी, गारगोटवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथे नदी पुनरुज्जीवन अंतर्गत सिमेंट बंधाऱ्यांची कामे शासनाच्या दिनांक २३ जून, २०१७ च्या निर्णयानुसार पाणी साठ्याशी निगडीत मापदंडात बसत नसल्याने रद्द करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांसाठी सिमेंट नाला बांध अतिशय उपयुक्त असून जमिनी खालील पाण्याची पातळी तसेच संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण करण्यासाठीच्या महत्वाच्या अशा पद्धतीमध्ये पाणी साठ्याशी निगडीत मापदंड वापराची अट शिथिल करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी मा.मुख्यमंत्री आणि मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने पाणी साठ्याशी निगडीत मापदंडाची अट शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे : (१) हे अंशत: खरे आहे.

प्रस्तुत सिमेंट नाला बांधाची कामे शासन निर्णय दि.२३/६/२०१७ मधील आर्थिक मापदंडात बसत नसल्याने प्रशासकिय मंजूरीबाबतची पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) शासन पत्र दि.०२/११/२०१७ अन्वये अनघड दगडातील बांधकाम संकल्पचित्राप्रमाणेच सिमेंट नाला बांध हा उपचार संधानक एम-१५ या ग्रेडमध्ये करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) योजनेच्या रोजगार निर्मितीत झालेली घट

(५२) * ९५३३८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) योजनेची घसरण झाली असून, सन २०१५-१६ मध्ये सरासरी प्रती कुटुंब मनुष्य दिवस निर्मिती ६० होती, सन २०१६-१७ मध्ये ४९ दिवसापर्यंत खाली आल्याचे मनरेगाच्या वार्षिक अहवालातील आकडेवारीतून माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनरेगात मजुरीचे दर वाढले असले तरी इतर क्षेत्रात, विशेषत: बांधकाम क्षेत्रात अधिक मजूरी मिळत असून, आदिवासी भागात कामाची मागणी असूनही मनरेगाचे काम उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कामाच्या नियोजनापासून ते मजुरीच्या वाटपापर्यंत पुरेशी पारदर्शकता न आल्याने मजूर शहरांकडे कामासाठी जात असल्याने आदिवासी भागामध्ये स्थलांतराचे प्रमाण जास्त असून, मजुरी वेळेवर न मिळणे ही सर्वात मोठी अडचण आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मजुरीची रक्कम उशिरा दिल्यास त्याप्रमाणात संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांना आर्थिक दंड आकारण्याची तरतूद असताना त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे गेल्या दोन वर्षात श्रमिकांनी या योजनेऐवजी कामासाठी अन्यत्र जाण्याचा पर्याय निवडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(६) असल्यास, त्यानुसार कामाचे दिवस वाढविण्यासह मजुरी देण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर योजना मागणी प्रधान योजना आहे.ग्रामपंचायत /यंत्रणा स्तरावर शेल्फ ठेवण्यात येतो व मागणी प्रमाणे मजुरांना कामे उपलब्ध करून देण्यात येतात.
(४) हे खरे नाही.
(५), (६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी व सिंदेवाही येथे पंचायत समितीच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी निधीसह मान्यता मिळण्याबाबत

(५३) * ९५२०७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी व सिंदेवाही येथे पंचायत समितीच्या नविन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठीचा प्रस्ताव अंदाजपत्रकासह प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांच्याकडे सादर करण्यात आला असून उक्त प्रस्ताव मंजूरीविना प्रलंबित ठेवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ब्रम्हपूरी व सिंदेवाही येथे पंचायत समितीच्या नविन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याबाबतचे निवेदन जिल्हयाचे पालकमंत्री तथा मा.वित्त व नियोजन मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनानुसार ब्रम्हपूरी व सिंदेवाही येथे पंचायत समितीच्या नविन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठीच्या प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) ब्रम्हपूरी व सिंदेवाही येथे पंचायत समितीच्या नविन प्रशासकीय इमारतीचे बांधकामाच्या प्रस्तावात आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याबाबत, जिल्हा परिषद चंद्रपूर यांना दिनांक २९.०५.२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. जिल्हा परिषदेकडून त्रुटींच्या पुर्ततेसह परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे दिनांक २०.०६.२०१७ व दिनांक २०.११.२०१७ रोजी स्मरणही करण्यात आले आहे.
सद्य:स्थितीत ब्रम्हपूरी व सिंदेवाही पंचायत समिती प्रशासकीय इमारत बांधकामाचा परिपुर्ण प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही.परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शिवाजी नगर (जि.पुणे) येथील बालसुधारगृहात ई-लर्निंगच्या पडद्यावर अश्लिल चित्रफीत दाखविल्या संदर्भातील समितीच्या अहवालाबाबत

(५४) * ९६३७१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजी नगर (जि.पुणे) येथील शासनाच्या बालसुधारगृहात ई-लर्निंगच्या पडद्यावर अश्लिल चित्रफीत दाखविणे यासंदर्भात सहयाद्री आदिवासी विकास प्रतिष्ठान बालकाश्रम पळस्टिका (ता.आंबेगाव, जि.पुणे) यांनी घेतलेले आक्षेप व केलेली तक्रार यास अनुसरुन आयुक्त, महिला व बालविकास यांनी सर्वसमावेशक चौकशी करीता त्रिसदस्यीय समिती नेमली असून समितीने आपला अहवाल शासनास सादर केला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अहवाल सादर करुन अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) व (२) सदर प्रकरणी विभागीय उपआयुक्त (म.व.बा.वि) पुणे विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत त्रिस्तेरीय समिती करण्यात आली होती. सदर समितीने त्यांच्या दि. २२/०७/२०१७ च्या पत्रानुसार सदर प्रकरणाची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल आयुक्तालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालानुसार पुढील कारवाई आयुक्त महिला व बालविकास यांच्य स्तरावरुन करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात नवजात बालकांसाठी जीवनरक्षक प्रणाली (व्हेंटिलेटर) व इन्क्यूबेटर उपलब्ध करुन देण्याबाबत

(५५) * ९५१४९ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर),

श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गंभीर प्रकृती असलेल्या नवजात बालकांसाठी जिल्हा रुग्णालयात आवश्यक जीवनरक्षक प्रणाली (व्हेंटिलेटर) व इन्क्यूबेटर उपलब्ध नसल्याने

राज्यात आरोग्य सुविधेअभावी २८११ बालकांचे व मातांचे शासकीय रुग्णालयात मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, नाशिक जिल्हा शासकिय रुग्णालयात गेल्या पाच महिन्यात १८७ नवजात बालकांचा मृत्यू झाला असून या जिल्हयात अर्भक मृत्यूदर ९ टक्के इतका आहे, एका महिन्यात झालेल्या ५५ बालमृत्यूमध्ये ६७% मुले अनुसूचित जमातींची तर ७१% ग्रामीण भागातील असून त्यातील ७२% मृत्यू हे केवळ कमी वजनाची मुले जन्माला आल्याने झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रायगड जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागात ४६५, ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात ४७ बालकांचा, कोल्हापूर जिल्हयात विविध कारणांमुळे आठ महिन्यात १७८ नवजात बालकांचा मृत्यू झाला आहे तसेच चंद्रपूर, गडचिरोली जिल्हयांसह बालमृत्यूचे प्रमाण अधिक असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत नवजात बालक कक्षात व्हेंटिलेटर व इन्क्यूबेटर उपलब्ध करुन देण्यासह राज्यातील बालमृत्यू व मातामृत्यू रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे नाही.

जिल्हयांकडून प्राप्त विशेष नवजात काळजी कक्षांच्या अहवालानूसार सन २०१७-१८ मध्ये माहे सप्टेंबर अखेर पर्यत एकुण २२८९ अर्भक मृत्यू झालेले आहेत. या बालकांच्या मृत्यूची प्रमुख कारणे.

Respiratory Distress Syndrome, Hypoxic Ischaemic Encephalopathy/Moderate-severe Birth Asphyxia, Sepsis हि आहेत.
(२) विशेष नवजात काळजी कक्ष, नाशिक येथे माहे एप्रिल ते ऑगस्ट २०१७ या दरम्यान एकूण २२७ अर्भक मृत्यू झाले असून अर्भक मृत्यू दर १५ % इतका आहे.

माहे ऑगस्ट २०१७ मध्ये एकूण ५५ अर्भक मृत्यू झाले असून त्यापैकी अनुसुचित जमातीची टक्केवारी ७१ % आहे. तसेच एकूण पैकी ग्रामीण भागाची टक्केवारी ७०.९० % आहे. एकूण पैकी कमी वजनाची (less than २५०० ग्रॅम) टक्केवारी ८५ टक्के आहे.

(३) एचएमआयएस च्या माहितीनुसार रायगडजिल्हयात सन २०१७-१८ माहे सप्टेंबर, २०१७ अखेर एकुण १६५ बालमृत्यू झालेले आहेत.

• ठाणे जिल्हा रुग्णालयामध्ये विशेष नवजात काळजी कक्षामध्ये माहे एप्रिल ते ऑगस्ट २०१७ या ५ महिन्यात ७३८ नवजात बालके दाखल झालेली असून त्यापैकी ४७ बालकांचा मृत्यू झालेला आहे.

• एचएमआयएस च्या माहितीनुसार कोल्हापूर जिल्हयात सन २०१७-१८ माहे एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत ० ते २८ दिवस या वयोगटातील एकूण १५६ नवजात बालमृत्यू झालेले आहेत.

• राज्यात एचएमआयएस च्या माहितीनुसार सन २०१७-१८ माहे सप्टेंबर अखेर ९२६० बालमृत्यू झालेले आहेत. चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हयांच्या एचएमआयएस च्या माहितीनुसार २०१७-१८ माहे सप्टें. अखेरपर्यंत अनुक्रमे ३३५ व ३३५ एवढे ० ते ५ वर्ष वयोगटातील बालमृत्यू झालेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यामध्ये विविध स्तरावर नवजात बालकांना सेवा सुविधा देण्यात येतात. त्यानुसार जिल्हा रुग्णालय स्तरावर प्रसूती कक्षामध्ये आणि शस्त्रक्रिया कक्षामध्ये न्यूबॉर्न केअर कॉर्नर तसेच आजारी नवजात बालकांसाठी स्पेशल न्यूबॉर्न केअर युनिट स्थापित करण्यात आले. राज्यातील केंद्र सरकारच्या निधीतून त्यांचे मार्गदर्शक तत्वानुसार स्थापन करण्यात आल्यामुळे जिल्हा रुग्णालयाच्या एसएनसीयुमध्ये व्हेंटीलेटरची सुविधा अपेक्षित नाही.

राज्यात उपलब्ध असलेल्या १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून जास्त रुग्ण भरती असणा-या विशेष नवजात काळजी कक्षामध्ये अतिरीक्त खाटांची व आवश्यक उपकरणांची व्यवस्था करण्यात येत आहे. वाढीव खाटांनुसार अतिरिक्त जागेसाठी १२ ठिकाणी वाढीव बांधकाम करण्यात येत आहे. तसेच राज्यात १३ ठिकाणी नवीन एसएनसीयु बाधंण्यात येत आहे. या व्यतिरीक्त वाढलेल्या खाटांसाठी जिल्हयातील १५ एसएनसीयुमध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार अतिरिक्त स्टाफ नर्स मंजूर करण्यात आल्या आहेत.

राज्यातील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी आरोग्य विभागा मार्फत पुढील उपाय योजना करण्यात येतात - संस्थात्मक प्रसूती, नियमीत लसीकरण, नवजात काळजी कक्ष, नवजात स्थिरीकरण कक्ष, विशेष नवजात काळजी कक्ष सोयी-सुविधा उपकरणे एचबीएनसी व इन्टेनसिफाईड एचबीएनसी, जीवनसत्व 'अ' व जंतनाशक मोहिम, बाल उपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र, मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत तज्ञांमार्फत मातांची व बालकांची तपासणी व उपचार, नवसंजीवनी कार्यक्रमा अंतर्गत मातृत्व अनुदान योजना, भरारी पथकां मार्फत आरोग्य तपासणी व उपचार, दायी बैठक योजना इ.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

रक्तपेढयांतील दूषित रक्त व रक्तघटकांच्या संक्रमणामुळे एड्‌सची बाधा झाल्याबाबत

(५६) * ९५१६५ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अजित पवार (बारामती), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वर्षभरात २८ हजार ९५२ जणांना एड्सची (एचआयव्ही) बाधा झाल्याबाबतची माहिती माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील एड्स नियंत्रण सोसायटीने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार सन २०१४ ते २०१७ या कालावधीत ७८ व्यक्तींना रक्त व लाल रक्तपेशी, प्लेटलेटस, प्लाझ्मा या रक्त घटकांच्या संक्रमणातून एड्सची बाधा झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार रक्तपेढयांमध्ये रक्त शुध्द ठेवण्यासह एड्स (एचआयव्ही) या आजारावर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे आहे.

(२) मुंबईतील एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्रांमध्ये निदान झालेल्या एचआयव्ही बाधीत रुग्णांनी समुपदेशन दरम्यान सांगितलेल्या संभाव्य संक्रमण मार्गाच्या माहितीनुसार, सन २०१४ ते २०१७ या कालावधीमध्ये ७८ एचआयव्ही संसर्गित व्यक्तिंकडून रक्त/ रक्तघटक चढवले गेल्याबद्दल सांगितले आहे.

(३) उक्त प्रकरणी मुंबई जिल्हा एड्स नियंत्रण संस्थेने चौकशी केली आहे. परंतु संबंधीत ७८ व्यक्तिंमध्ये एचआयव्ही बाधीत रक्त/रक्त घटक चढवल्यामुळे एचआयव्ही संसर्ग झाला याबाबत कोणताही निश्चित पुरावा आढळला नाही. त्यामुळे याबाबत खात्रीलायक अनुमान काढता येत नाही.

(४) रक्तपेढयांमध्ये संसर्गमुक्त रक्त उपलब्ध करण्यासाठी राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या मार्गदर्शनानुसार ऐश्चिक रक्तदानाबद्दल जनजागृती करण्यात येत आहे, एचआयव्ही/एड्स या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी जनजागृती, ऐच्छिक समुपदेशन व चाचणी, लैंगिक आजार-निदान व उपचार, एचआयव्ही बाधितांसाठी एआरटी उपचार पध्दती, नवजात बाळांतील संसर्ग रोखण्यासाठी एचआयव्ही बाधित गर्भवती महिलांवर उपचार केले जात आहेत. अशा विविध उपाययोजना केल्या जातात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

नार-पार लिंग प्रकल्पातील महाराष्ट्राच्या हक्काचे पाणी गुजरात राज्याला न देण्याबाबत

(५७) * ९६१८० श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नार-पार लिंग प्रकल्पातील महाराष्ट्राच्या हक्काचे पाणी गुजरात राज्याला देण्यात येऊ नये याबाबतची मागणी नाशिकच्या सर्व लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री व प्रधान सचिव यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात व दोन वर्षापासून लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार नार-पार लिंग प्रकल्पातील महाराष्ट्राच्या हक्काचे पाणी गुजरात राज्याला न देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) होय.

(२) महाराष्ट्र शासन,गुजरात शासन व केंद्र सरकार यांचे सोबत दि.३/५/२०१० रोजी सामंजस्य करार झालेला आहे. सदर करारानुसार पार -तापी-नर्मदा नदी जोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत तयार करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प अहवालावर राज्याची भूमिका निश्चित करणे व दमणगंगा, नार-पार, अंबिका, औरंगा या पश्चिम वाहिनी नदी

खोऱ्यातील पाणी वापराचा बृहत आराखडा तयार करणेसाठी दि.४.४.२०१६ च्या शासन निर्णयान्वये गठित समितीच्या जलशास्त्रीय अभ्यासानुसार नार-पार-अंबिका-औरंगा खो-यातील महाराष्ट्र राज्याच्या भागात उपलब्ध पाणी ८८८.०७ दलघमी आहे. प्रकल्प अहवालानुसार सदर योजनेसाठी एकूण १३३० दलघमी पाण्याचा वापर प्रस्तावित असून गुजरात हद्यीतून ८९६ दलघमी व महाराष्ट्राच्या हद्यीतून ४३४ दलघमी पाणी वापर प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबादच्या छावणी परिसरातील नागरिकांना गॅस्ट्रोची लागण झाल्याबाबत

(५८) * १०१९४५ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबादच्या छावणी परिसरातील ६०० हून अधिक नागरिकांना गॅस्ट्रोची लागण झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे रुग्णालयातील खाटा कमी पडत असल्याने रुग्णांना जमिनीवरच उपचार घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भागात तातडीने वैद्यकीय सेवा पुरवून गॅस्ट्रोच्या साथीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

औरंगाबाद छावणी परिसरात दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी गॅस्ट्रो उद्रेकाची लागण झाली होती, ही वस्तुस्थिती आहे.

(२) औरंगाबाद छावणी रुग्णालय २० खाटांचे असल्याने आणि रुग्ण संख्येत अचानक वाढ झाल्याने सुरुवातीचे दोन दिवस रुग्णांवर जमिनीवर गादया टाकून उपचार करण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे. त्यानंतर खाटांची पुरेशी पर्यायी व्यवस्था करण्यात आली.

(३) औरंगाबाद छावणी परिसरातील गॅस्ट्रो उद्रेक नियंत्रणात आणण्यासाठी खालीलप्रमाणे उपचारात्मक व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या:

• आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत साथग्रस्त भागात सर्वेक्षण,

• उपचार व सर्वेक्षणासाठी औरंगाबाद महानगरपालिका, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेकडून अतिरिक्त मनुष्यबळ आणि औषध पुरवठा,

• पाणी शुध्दीकरणासाठी घरोघरी मेडिक्लोर द्रावणाचे तसेच ओ.आर.एस. पाकीटांचे वाटप,

• प्रयोगशाळेद्वारे पाणी व टी.सी.एल. पावडरची तपासणी,

• रुग्णांवर तातडीने आणि प्रभावी उपचार,

• पाणी पुरवठा तात्पुरता बंद करुन जलवाहिनी दुरुस्त करण्यात आली. खंडीत पाणीपुरवठा कालावधीत पर्यायी शुध्द पाणीपुरवठा करण्यात आला,

• गृहभेटीद्वारे परिसरातील लोकांचे वैयक्तिक व परिसर स्वच्छता, पिण्याच्या पाण्याबाबत घ्यावयाची काळजी यासंदर्भात प्रबोधन,

• गृह भेटीद्वारे हस्तपत्रिका वाटप.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगळुद (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील अंगणवाडीच्या पोषण आहारात बुरशी व अळ्या आढळल्याबाबत

(५९) * ९५८०२ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगळुद (ता.दर्यापूर, जि.अमरावती) ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या अंगणवाडीतील लहान बालकांना देण्यात आलेल्या पौष्टीक शेवया पोषण आहारात बुरशी व अळ्या आढळल्याचे दिनांक २५ ऑगस्ट २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दर्यापूर तालुक्यातील तीन ग्रामपंचायतीमध्ये सदर पाकिटांचे वाटप करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ७० लहान बालकांच्या आरोग्याच्या तपासणीसह या प्रकरणाची चौकशी शासनाने केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित पुरवठादारावर आणि अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २४.८.२०१७ रोजी अमरावती जिल्हयातील दर्यापूर प्रकल्पांतर्गत सांगळूद येथील अंगणवाडी केंद्र क्रमांक २ येथे २३ लाभार्थ्यांसाठी शेवईचे पाकिटे प्राप्त झालीत. यापैकी ३ ते ४ पाकिटांमधील हवा निघून गेल्याने पाकिटे चिपकले असल्याचे सरपंच व इतर ग्रामस्थांसमोर सदर पाकिटे उघडले असता आढळून आले. या शेवयांचा रंग हिरवा (बुरशीसारखा) दिसून आल्यामुळे शेवया मोकळया न राहता एकमेकांना चिपकल्या असल्याने त्यांचा गोळा झाल्याचे आढळून आले.
(२) हे अंशत: खरे आहे.

बाल विकास प्रकल्प अधिकारी दर्यापूर यांनी सांगळूद येथील अंगणवाडीला भेट देऊन चिपकलेले व चांगले अशा दोन्ही प्रकारची सर्व पाकिटे ताब्यात घेऊन जिल्हा कार्यालयात जमा केलीत. त्यामुळे या पाकिटांचे लाभार्थ्यांना वाटप झालेले नाही.
(३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २६.८.२०१७ रोजी सांगळूद गावाला भेट देऊन पाकिटे हवाबंद नसल्यामुळे आर्द्रतेमुळे खराब झाल्याची तपासणी केली व सदर पाकिटे बदलून देण्याबाबत संबंधित पुरवठादारास त्याच दिवशी निर्देश दिल्यामुळे संबंधित पुरवठादाराने सदर अंगणवाडीतील सर्व पाकिटे तात्काळ बदलून दिलेले आहेत.
(४) व (५) संबंधीत पुरवठादाराने सदर अंगणवाडीतील शेवईची सर्व पाकीटे त्वरित बदलून दिली असल्याने पुरवठादार तसेच अधिकाऱ्यांवर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील रस्त्यांची प्रधानमंत्री ग्रामसडक योजना विशेष दुरूस्ती कार्यक्रमांतर्गत दुरूस्ती करण्याबाबत

(६०) * १००९१३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील रस्त्यांची प्रधानमंत्री ग्रामसडक योजना विशेष दुरूस्ती कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या वर्षात दुरूस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांचेकडे दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार राधानगरी तालुक्यातील रस्त्यांची प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय, हे खरे आहे.

(२) मा.लोकप्रतिनिधींनी दि.२६.०४.२०१७ रोजीच्या लेखी पत्राद्वारे रस्ते दुरुस्तीसाठी उल्लेख केलेल्या रस्त्यांपैकी

(अ) रा.मा. १३० झुलपेवाडी बेंगवडे बेंडिव रस्ता (सा.क्र.७/०० ते १०/०००) ता.भूदरगड व

(ब) रा.मा.१२० ते तिरवडे देवूळवाडी कारिवडे रस्ता (सा.क्र.४/५०० ते ८/००) ता.भूदरगड, ही दोन कामे विशेष देखभाल दुरुस्ती सन २०१६-१७ मधून मंजूर असून सदर कामे प्रगती प्रथावर आहेत.

(क) प्रजिमा ५८ ते राणेवाडी किल्ले भुदरगड रस्ता (सा.क्र.३/०० ते ६/००) ता.भूदरगड हे काम विशेष देखभाल दुरुस्ती सन २०१७-१८ मधून प्रस्तावित आहे.

तसेच (अ) रा.मा.१३० झुलपेवाडी बेगवडे बेडिव रस्ता, ता. भूदरगड,

(ब) प्रजिमा ५८ ते राणेवाडी किल्ले भूदरगड रस्ता, ता.भूदरगड,

(क) प्रजिमा ५४ ते नाधवडे टिक्केवाडी रस्ता, ता.भूदरगड,

(ड) रा.मा.१२० ते तिरवडे देवूळवाडी करिवडे रस्ता, ता.भूदरगड,

उपरोक्त रस्त्यांवरील उर्वरित खराब लांबीतील खड्डे भरणेची कामे नियतकालिक दुरुस्ती (Zonal Maintenance) कार्यक्रम सन २०१७-१८ मध्ये मंजूर असून निविदास्तरावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासींना घरगुती गॅस शेगडीसाठी निधी देण्याबाबत

(६१) * ९७१६८ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.धैर्यशील पाटील (पेण) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासींना वन विभागाकडून घरगुती गॅस शेगडी देण्याची योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-१४ मध्ये उक्त तालुक्यातील ६०० हून अधिक लाभार्थ्यांनी गॅस शेगडी अनुदान मिळावे म्हणून २५ टक्के प्रमाणे रुपये १,२००/- इतकी रक्कम जमा करूनही त्यांना अद्यापही गॅस शेगडी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेसाठी वन विभागाला आदिवासी विभागाकडून देय असलेले अर्थसाहय तीन वर्षापासून मिळाले नसल्याने लाभार्थ्यांना गॅस शेगडी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू अर्थसाहय वन विभागाला विनाविलंब मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) वनालगतच्या गावात राहणारे लोक विशेषत: आदिवासी व मागासवर्गीय आहेत, अशा कुटुंबाना गॅस कनेक्शन पुरवठा करण्याची योजना शासन निर्णय दिनांक १० जुलै, २०१२ अन्वये वन

विभागाअंतर्गत कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदर योजना आदिवासी विकास विभाग शासन परिपत्रक दिनांक १८.९.२०१५ अन्वये राज्य योजनेमधून काढून जिल्हा वार्षिक योजनेमध्ये समाविष्ठ करण्यात आलेली आहे.

(२) अलिबाग वन विभागातील कर्जत तालुक्यात सन २०१२-१३ व २०१३-१४ या कालावधीतील एकूण लाभार्थ्यापैकी सन २०१२-१३ मध्ये ६५७ लाभार्थ्यांना नवीन गॅस कनेक्शन वाटप करण्यात आलेले आहे. तथापि सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात अनुदान उपलब्ध न झाल्याने लाभार्थ्यांना गॅस कनेक्शन व सिलेंडर वाटप करण्यात आलेले नाही. तथापि सन २०१४-१५ व २०१५-१६ या कालावधीत वरील ६५७ लाभार्थ्यांना रिफील व सन २०१५-१६ यावर्षी १३५ लाभार्थ्यांना नवीन कनेक्शन वाटप करण्यात आलेले आहे.

सदर योजनेंतर्गत ६७० लाभार्थ्यांना अद्यापी गॅस कनेक्शनचा लाभ मिळालेला नाही. उपरोक्त लाभार्थ्यांनी जमा केलेली रक्कम ही संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या खात्यात जमा आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) सदर योजनेअंतर्गत चालू आर्थिक वर्षात जिल्हा आदिवासी वार्षिक उपयोजनेतून पुनर्विनियोजनाव्दारे तसेच राज्यस्तरीय योजनेमधून आदिवासी लाभार्थ्यांना अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाकाडोंगरी (जि.भंडारा) वनपरिक्षेत्रात वृक्ष लागवडीत झालेली अनियमितता

(६२) * १०११९३ श्री.चरण वाघमारे (तुमसर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाकाडोंगरी (भंडारा वनविभाग) (जि. भंडारा) वनपरिक्षेत्रात सन २०१५-१६ व २०१६-१७ या दोन वर्षात झालेल्या वृक्ष लागवडीच्या कामात जेसीबीने कामे करून मजुरांच्या नावाने कामाचे देयके घेतल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.वने मंत्री यांना दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) होय.

लोकप्रतिनीधींची दि.८ नोव्हेंबर २०१७ ची तक्रार दि.१५.११.२०१७ रोजी प्राप्त झाली आहे.

(२) होय.

उपरोक्त तक्रारींच्या अनुषंगाने प्रकाष्ठ निष्कासन अधिकारी गडेगाव आगर यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे. त्यांनी दि.२९.११.२०१७ रोजी चौकशी अहवाल सादर केला आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) नागपूर यांनी दि.२.१२.२०१७ रोजी वन परिक्षेत्र अधिकारी व वनपाल नाकाडोंगरी यांना निलंबित करण्यात आले असून संबंधितावर शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

धुळे जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सिमेंट नालाबांधाची १२८ कामे रद्द केल्याबाबत

(६३) * ९५०२८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत विविध कामे शासनाने सुरु केली असून त्यात प्रामुख्याने सिमेंट नाला बांध बांधण्याच्या कामाचा समावेश असून सिमेंट नालाबांधकामात दहा ते बारा टक्केच पाणी साठत असून नाल्यात

मोठया प्रमाणावर गाळ जमा होत असल्याने जिल्हयातील सिमेंट नालाबांधाची १२८ कामे रद्द केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे जिल्हयातील भूजल पातळी वाढविण्यासाठी नालाबांध बांधण्यासह शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे : (१) हे खरे नाही.

तथापि, शासनाच्या सिमेंट नाला बांध कामांकरिता सुधारित भौतिक व आर्थिक मापदंडाच्या एकत्रित मार्गदर्शक सुचनांनूसार धुळे जिल्हयात सन २०१६-१७ मधील लघुसिंचन (जलसंधारण) विभागाकडील सिमेंट बंधाऱ्याची ७५ कामे अपात्र ठरत असल्याने सदर कामांची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

(२) धुळे जिल्हयात जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ अंतर्गत प्रस्तावित २५९५ कामांपैकी २४/११/२०१७ अखेर १६२५ कामे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित कामे विहीत वेळेत पूर्ण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. अपात्र सिमेंट बंधारे कामाऐवजी आराखड्याबाहेरील व सेवाभावी संस्थेमार्फत जलसंवर्धनाची (नाला खोलीकरण/ रूंदीकरण व सिमेंट बंधारे) कामे घेण्यात आलेली आहेत त्यामुळे पाणी ताळेबंदामध्ये तफावत दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या अहवालानुसार एकाच महिन्यात १ हजार २३६ बालमृत्यू झाल्याबाबत

(६४) * ९५०८७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर),

श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुरेश लाड (कर्जत), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या अहवालानुसार राज्यात माहे एप्रिल या एकाच महिन्यात १ हजार २३६ बालमृत्यू झाले आहेत त्यातील शून्य ते एक वयोगटातील मुलांची संख्या ९१६ असून १ ते ५ वर्षातील बालमृत्यू ३२० असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील कुपोषित बालकांची समस्या गंभीर असून सन २०१६-१७ या वर्षात चार लाख बालके तीव्र कमी वजनाची तर ८८ हजार बालके अतितीव्र कमी वजनाची असल्याचे महिला व बालविकास विभागाच्या अहवालात नमूद केल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडयामध्ये देण्यात येणाऱ्या आहारामध्ये लोह व आयोडीन युक्त मिठाचा वापरा करावा असे धोरण केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाने सन २०११ मध्ये निश्चित केले असून मा.मुख्यमंत्री यांनी केंद्र शासनाच्या धोरणाचा स्पष्ट उल्लेख करुन आरोग्य विभाग, महिला व बालविकास, अन्न व नागरी पुरवठा, आदिवासी व शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना दिनांक २३ जून, २०१६ रोजी पत्रान्वये केंद्र शासनाच्या धोरणाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू बालमृत्यू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू रोखण्यासह व केंद्र शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय.

(२) हे खरे नाही.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत माहे मार्च २०१७ च्या मासिक प्रगती अहवालावरुन बालकांची श्रेणीनिहाय माहिती खालील प्रमाणे

एकूण वजन घेतलेली बालके	सर्वसाधारण बालके	मध्यम कमी वजनाची बालके	तीव्र कमी वजनाची बालके
६१११४५०	५४८२३९३	५५०६२५	७८४३२

(३) होय.

(४) राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ग्रामीण, नागरी प्रकल्पांमार्फत दरमहा मासिक प्रगती अहवाल ऑनलाईन भरण्यात येतात. सदर अहवालामध्ये बालमृत्यू संख्या व त्याची कारणे दर्शविण्यात येतात व त्याचा वेळोवेळी मासिक बैठकीमध्ये आढावा घेण्यात येतो.

(५) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी त्यांच्या दिनांक २२.८.२०१६ च्या पत्राने राज्यातील सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) व बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प यांना आयोडिनयुक्त मिठाचा वापर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील पाच वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित असलेल्या थकीत विक्रीकराची वसूली करण्याबाबत

(६५) * ९५४७७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या विक्रीकर विभागाने माहे मार्च, २०१६ अखेर प्रलंबित असलेल्या विक्रीकराच्या संदर्भात दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ मध्ये दिलेल्या माहितीनुसार राज्यात मूल्यवर्धीत विक्रीकराची (व्हॅट) ८० हजार ५०५ कोटी तर मुंबई विक्रीकर अधिनियमाची (बीएसटी) २६ हजार ९९७ कोटी अशा एकूण सुमारे १ लाख ७ हजार ५०२ कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाच वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित असलेल्या प्रकरणातील सदर थकीत रकमेची वसूली कालपव्ययामुळे वसूल न होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, थकीत रकमेची वसूली करण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये मा.वित्त मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदरची थकबाकी तातडीने वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) होय खरे आहे.

(२) हे खरे नाही, पाच वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित असलेल्या रु.२६१७२.०२ कोटीपैकी बहुतंश: रक्कम अपीलामध्ये प्रलंबीत आहे व वसूलीकरीता उपलब्ध असलेल्या रकमेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) होय खरे आहे.

(४) प्रलंबित महसूलाची वसूली करण्याकरीता विविध उपाययोजना करण्यात येत असून, ज्यामध्ये अपील प्रकरणाचा महसूलाच्या प्राधान्याने निपटारा, लापता व्यापाऱ्यांचा ठावठिकाणा विविध माध्यमातून जसे आयकर विभाग, पोस्ट ऑफिस, पोलीस स्टेशन यांच्याशी संपर्क साधून शोधणे, जमीन महसूल अधिनियमांतर्गत व्यापाऱ्याच्या मालमत्तेची जप्ती व लिलाव यांचा समावेश आहे.

(५) लागू नाही.

रक्त संकलन आणि शिबीरातील नियोजनाअभावी दरवर्षी हजारो युनिट रक्ताचा अपव्यय होत असल्याबाबत

(६६) * ९५२१५ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात

(संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ७३ पालिका व सरकारी रक्तपेढ्यांच्या आकडेवारीनुसार माहे जानेवारी ते जून, २०१७ या सहा महिन्यांच्या कालावधीत ३३,६४२ युनिट रक्त म्हणजे ११,७७४ लिटर रक्त वाया गेल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई शहर-उपनगरातील ३४ शासकीय आणि महापालिकेच्या रक्तपेढयांमधील तब्बल १ हजार ९२ युनिट रक्त म्हणजे जवळपास ३८२ लिटर रक्त जानेवारी, २०१७ ते जून, २०१७ या कालावधीत वाया गेल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रक्त संकलन आणि शिबिरातील नियोजनाचा अभाव तसेच अनेक रक्तपेढ्यांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक रक्ताची साठवणूक होत असून रक्तपेढ्यांच्या अभावामुळे दरवर्षी हजारो युनिट रक्ताचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रक्तपिशव्या बाद होऊ नये तसेच सदरहू रक्तपिशव्या मुदतीपूर्वी गरजू रुग्णांना मिळण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे नाही.

राज्य रक्त संक्रमण परिषदेने संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या माहितीनुसार वाया गेलेल्या रक्ताचा आकडा ३३६४ युनिट असा आहे. काही वृत्तपत्रांनी तो ३३६४२ असा चुकीचा आकडा देऊन वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द केली होती. त्याबाबत खुलासा दिलेला आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

तथापि, मुंबई शहर-उपनगरामध्ये शासकीय /महापालिकेच्या फक्त १७ रक्तपेढया कार्यरत आहेत व एकूण रक्त संकलन ६०,७९० युनिट कालबाहयतेमुळे रक्त वाया गेल्याची आकडेवारी १०९२ युनिट एवढी आहे. ती एकूण संकलनाच्या फक्त १.८०% एवढी आहे. सदर वाया गेलेले रक्त एकूण रक्त संकलनाच्या प्रमाणात अगदी नगण्य आहे व गरजेच्या व आपत्कालीन स्थितीमध्ये मुंबई सारख्या महानगर शहरामध्ये रक्त उपलब्ध असण्याचा दृष्टीकोन अटळ आहे.

(३) हे खरे नाही.

सदरचे काळातील एकूण रक्त संकलन १,८५,८९४ युनिट आहे. कालबाहयतेमुळे रक्त वाया गेल्याची आकडेवारी ३३६४ युनिट एवढी आहे. ती एकूण संकलनाच्या फक्त १.८०% एवढी आहे. सदर वाया गेलेले रक्त एकूण रक्तसंकलनाच्या प्रमाणात अगदी नगण्य आहे व गरजेच्या व आपत्कालीन स्थितीमध्ये रक्त उपलब्ध असण्याच्या दृष्टीने अटळ आहे.

(४) लागू नाही.

(५) लागू नाही.

दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील उपजिल्हा रूग्णालयाची झालेली दुरवस्था

(६७) * ९८४१६ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील उपजिल्हा रूग्णालयाची दुरवस्था झाली असून या उपजिल्हा रूग्णालयात आवश्यक वैद्यकिय अधिकारी नसल्याने गरजू रुग्णांना योग्य प्रकारे उपचार मिळत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या उपजिल्हा रूग्णालयाला आवश्यक वैद्यकीय अधिकारी व उत्तम दर्जाची वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे नाही.

(२) व (३) उपजिल्हा रुग्णालय दापोली येथील वैद्यकीय अधिक्षकाचे पद रिक्त आहे. वैद्यकीय अधिकारी गट अ संवर्गातील १ स्त्रीरोग तज्ञ, १ भूलतज्ञ, १ बालरोगतज्ञ, १ भिषक, १ शल्य चिकित्सक व १ अस्थायी वैद्यकीय अधिकारी अशी ६ पदे भरली असून एक पद रिक्त आहे. तथापि, उपजिल्हा रुग्णालय दापोली येथे राष्ट्रीय आरोग्य अभियानांअतर्गत आयपीएचएस मानकानुसार एकूण ९ वैद्यकीय तज्ञांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर वैद्यकीय तज्ञांमार्फत रुग्णांना आवश्यक सेवा उपलब्ध करुन दिली जात आहे. तसेच रुग्णालयातील उपलब्ध साधनसामुग्री व यंत्रसामुग्री यांचा आवश्यकतेनुसार वापर करुन जनतेस आरोग्य सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.